### 'वंचित'ला सिलिंडर की शिट्टी?

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांची भेट घेतली. वंचित बहुजन आघाडीला आगामी निवडणुकीत चिन्ह काय असावे, यासंदर्भात त्यांच्यासोबत चर्चा झाली. वंचित बहुजन आघाडीकडून गॅस सिलिंडर, शिट्टी आणि रोड रोलर या चिन्हांचा प्रस्ताव देण्यात आला आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीसाठी वंचितला कपबशी हे चिन्ह देण्यात आले होते. तर, काही उमेदवारांना किल्ली, शिट्टी, पतंग हे चिन्ह देण्यात आले होते.


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २३ मार्च २०२४

किंमत ४ ₹


### कलाकार निवडणुकीच्या आखाड्यात

**मुंबई :** शिंदेंच्या शिवसेनेकडून अभिनेता गोविंदाला उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळणार, अशी चर्चा सुरु आहे. अशातच काँग्रेसकडून अभिनेत्री स्वरा भास्कर गोविंदा विरोधात निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. स्वरा भास्कर लवकरच काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहे. स्वरा भास्करच्या उमेदवारीबाबत काँग्रेसच्या नेत्यांमध्ये चर्चा सुरु आहे. उत्तर मध्य मुंबई या मतदारसंघातून पुन्हा एकदा पूनम महाजन निवडणूक लढण्यासाठी उत्सुक आहेत. या मतदारसंघातून शिंदे गट अभिनेता गोविंदाला मैदानात उतरवण्याच्या विचारात आहे.

# थकबाकीदारांना शॉक

प्रमोद जाधव


| अलिबाग |

रायगड जिल्ह्यामध्ये एक लाखांहून अधिक वीज बिल थकबाकीदार आहेत. यामध्ये सरकारी कार्यालयांपासून कारखानदार व व्यापाऱ्यांचादेखील मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. ९९ कोटी ९० लाख ८५ हजार रुपयांचे वीज बिल थकीत आहे. थकबाकीदारांना वीजपुरवठा खंडित करण्याचा शॉक महावितरणकडून दिला जात आहे. आतापर्यंत चार हजार ९५२ जणांचा वीजपुरवठा खंडित केल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

पान २ वर

## महावितरणचे ९९ कोटी बिल थकले

## जिल्ह्यातील एक लाखाहून अधिकांचा वीजपुरवठा खंडित



| थकबाकीदारांवर दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| वर्गवारी | ग्राहक | रक्कम (रुपये) |
| व्यापारी | ७५२८ | दोन कोटी ६८ लाख |
| औद्योगिक | ३८१ | ४४ लाख ६८ हजार |
| पथदिवे | २८७७ | ८७ कोटी १२ लाख |
| सरकारी कार्यालये | १८४४ | ९३ लाख ९३ हजार |
| एकूण | १,००,७८४ | ९९ कोटी ९० लाख |

### घरगुती आठ कोटींचे बिल थकले

महावितरण कंपनीकडून वैयक्तिक तथा घरगुती बिल थकविणाऱ्यांविरोधात मोहीम हाती घेतली आहे. पाचशे रुपयांपासून बिल थकलेले असले, तरीदेखील त्यांच्याकडून वसूल केले जात आहे. ८८ हजार १५४ ग्राहकांकडून ८ कोटी ७० लाख रुपयांचे बिल थकले आहे. ते वसूल करण्याचे काम महावितरण कंपनीकडून केले जात आहे.

# लालपरी चाकरमान्यांच्या दिमतीला

## होलिकोत्सावासाठी रायगडमधून ३४ ज्यादा बसेस

| अलिबाग | प्रतिनिधी |

गणेशोत्सवानंतर कोकणात होलिकोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मुंबई, डोंबिवली, कल्याण, ठाणे, पालघरमध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त असणारे चाकरमानी होळीची सुट्टी घेऊन गावी जातात. ग्रामस्थ, कुटुंबियांसमवेत हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात.

यंदा रविवार (दि.२४) मार्च रोजी होळी दहन व सोमवार (दि.२५) मार्च रोजी धुळवड सण आहे. यानिमित्ताने चाकरमान्यांची गावी जाण्याची तयारी सुरु झाली आहे. काहीजण खासगी वाहनाने, तर काही एसटी बसमधून गावी जाणार आहेत. चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा तसेच त्यांना रायगडसह कोकणात वेळेवर पोहोचता यावे यासाठी रायगडची लालपरी सज्ज झाली आहे.

एसटी महामंडळ रायगड विभागाने होलिकोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ३४ ज्यादा बसेसची व्यवस्था केली आहे. मुंबई, ठाणे, नालासोपारा येथून १८ बसेस रायगड जिल्ह्यात येणार आहेत. त्यामध्ये बोरीवली, मुंबई, कल्याण येथून महाड; भांडूप, मुंबई, बोरीवली येथून श्रीवर्धन; नालासोपारा व परळ येथून खुटील; ठाणे येथून पोलादपूर, बोरीवलीमधील खामगाव; स्वारगेटमधून माणगाव, मुंबई, नालासोपारामधून मुरुड एसटी बसेस असणार आहेत. तसेच परतीच्या मार्गावर जाणाऱ्या प्रवाशांसाठी खुटीलमधून नालासोपारा, परळ, पोलादपूरमधून ठाणे,



पान २ वर

# शरद पवार गटाची पहिली यादी जाहीर

- माढाची जागा रासपसाठी राखीव
- शिरुरमधून पुन्हा कोल्हेंना उमेदवारी

| मुंबई | प्रतिनिधी |

काँग्रेसने गुरुवारी सात उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर शुक्रवारी (दि. २२) शरद पवार गटाकडून संभाव्य नऊ जणांची यादी जाहीर करण्यात आली आहे. महत्त्वाचं म्हणजे, राज्यभरात चर्चेत असलेल्या माढा लोकसभेची जागा शरद पवारांनी महादेव जानकर यांच्या रासपसाठी सोडली आहे. दरम्यान, या यादीमध्ये बारामती, माढा, सातारा, शिरुर, नगर दक्षिण, बीड आणि वर्धा या जागांचा समावेश आहे.

बारामतीत खासदार सुप्रिया सुळे, माढ्यातून महादेव जानकर, साताऱ्यातून माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील किंवा श्रीनिवास पाटील हे उमदेवार असतील. तर शिरुरमधून अमोल कोल्हे, नगर दक्षिणमधून निलेश लंके, बीडमध्ये बजरंग सोनावणे किंवा ज्योती मेटे तर वर्ध्यातून अमर काळे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

## मुरुडमध्ये बुधवारी शेकापचा कार्यकर्ता मेळावा

| अलिबाग | प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचा मुरुडमध्ये कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला आहे. शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थित हा मेळावा २७ मार्च रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास होणार आहे. कार्यकर्त्यांनी या मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांनी केले आहे.

मुरूड-जंजिरामधील हिंदू एज्युकेशन सोसायटी (हिंदू बोर्डींग) विश्रामबागेच्या

पान २ वर

# भाजपाच मालामाल

## निवडणूक रोख्यांमधून सर्वाधिक निधी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

सर्वोच्च न्यायालयाने स्टेट बँक ऑफ इंडियाला निवडणूक रोख्यांसंबंधी सर्व माहिती २१ मार्चपर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले होते. एसबीआयने दिलेल्या माहितीनुसार निवडणूक आयोगाने गुरुवारी निवडणूक रोख्यांसदर्भातील माहिती जाहीर केली. यानुसार, भाजपाला देणगी देणाऱ्या ४८७ कंपन्यांपैकी टॉप १० कंपन्यांनी २११९ कोटी रुपये दिले आहेत. ही रक्कम एप्रिल २०१९ पासून रोखण्यात आलेल्या पक्षाच्या एकूण ६०६० कोटी रुपयांच्या निवडणूक रोख्यांच्या ३५ टक्के आहे.



राजकीय पक्षांना सर्वाधिक देणगी देणाऱ्या फ्युचर गेमिंगने १३६८ कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले आहेत. यापैकी भाजपाला १०० कोटी, काँग्रेसला ५० कोटी, द्रमुकला ५०९ कोटी, वायएसआर काँग्रेसेला १६० कोटी दिले आहेत. तर देणगीदार क्रमांक २ मेघा ग्रुपने एकूण १ हजार १९२ कोटींचे रोखे खरेदी केले असून, भाजपाला ५८४ कोटी आणि काँग्रेसला ११० कोटींचं वाटप केलं आहे.

एमकेजे समूहाच्या चार कंपन्यांनी एकूण ६१७ कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले असून, ते तिसऱ्या क्रमांकाचे मोठे देणगीदार आहेत. या रोख्यातून भाजपाला ३७२ कोटी रुपये, काँग्रेसला १६१ कोटी, तृणमूल काँग्रेसला ४७ कोटी रुपये मिळाले आहेत.

RPSG च्या आठ कंपन्यांनी ५८४ कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले, ज्यामुळे ते चौथ्या क्रमांकाचे देणगीदार बनले. समूहाच्या चार प्रमुख देणगीदार कंपन्यांनी - हल्दिया एनर्जी (रु. ३७७ कोटी), धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर (रु. ११५ कोटी), फिलिप्स कार्बन (रु. ३५ कोटी) आणि क्रेसेंट पॉवर (रु. ३४ कोटी) यांनी मिळून ५६१ कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले.

पान २ वर

# केजरीवालांना दहा दिवसांची कोठडी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

नवी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित दारू घोटाळ्यात गुरुवारी (दि. २१) रात्री अटक करण्यात आली आहे. त्यांना शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता सुनावणीदरम्यान ईडीकडून दहा दिवसांच्या कोठडीची मागणी करण्यात आली होती. ती मंजूर करण्यात आली आहे.

दरम्यान, मी आत असो वा बाहेर, माझे जीवन देशासाठी समर्पित आहे, अशी प्रतिक्रिया केजरीवाल यांनी दिली आहे. केजरीवाल यांचे वकील विवेक जैन यांनी ही बेकायदेशीर



अटक आहे, त्यांच्याविरुद्ध कोणताही पुरावा नाही, अशी प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान, दिल्लीच्या कथित मद्य घोटाळा प्रकरणात ईडीने मुख्यमंत्री केजरीवाल यांना नऊ वेळा समन्स पाठवल्यानंतर काल रात्री अखेर अटक केली आहे. बुधवारी दहावा समन्स घेऊन आलेल्या अधिकाऱ्यांनी दोन तास

पान २ वर





VISHAL SUZUKI

At. Sr. No. 94/1, Pimpalbhat Chendhare - Po. R.C.F. Kurul Colony, Tal. Alibag, Dist. Raigad - 402 209.

Mob. : 8422810925 / 8422810917 | Email : vishalsuzuki.alibag@gmail.com

निवडक

## पथदिवे बसविण्याची मागणी

**अलिबाग :** तालुक्यातील कार्लेखिंडीत पथदिवे नसल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य असते. आधीच जंगल भाग असल्याने काळोखात प्रवास करताना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने नवख्या वाहनचालकांना चाचपडावे लागत आहे. त्याचप्रमाणे या परिसरातील रस्ता वळणावळणाचा असल्याने अनेकदा वाहनचालकांना समोरील काहीच दिसत नाही. तरी, संबंधित विभागाने या परिसरात पथदिव्यांची व्यवस्था करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

## रस्त्याची खड्ड्यांमुळे चाळण

**अलिबाग :** तालुक्यातील कार्लेखिंडमार्गे रेवस रस्त्याची मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अक्षरशः चाळण झाली आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता अशी दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे या मार्गाने प्रवास करताना वाहनचालकांची पुरती दमछाक होत असून, वाहने नादुरुस्त होण्याचे प्रकारदेखील वाढले आहेत. तरी, संबंधित विभागाने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशी वाहनचालकांसह प्रवाशांची मागणी आहे.

## नर्गिस यांना मानवंदना

**आंबेत :** माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर.अंतुले यांच्या धर्मपत्नी नर्गिस अंतुले यांचे गुरुवारी (दि. २०) वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. यावेळी रायगड जिल्ह्यासह अन्य सर्वत्र पक्षीय कार्यकर्त्यांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. याप्रसंगी म्हसळा तालुका महसूल विभागाकडून नर्गिस अंतुले यांना पुष्पहार चढवून मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी नायब तहसीलदार तेलंगे रावसाहेब, मंडळ सर्कल अधिकारी खामगाव, सलीम शहा, तलाठी कळंबे तात्या आदी मान्यवर उपस्थित होते.

## तलवार बाळगल्याप्रकरणी कारवाई

**पनवेल :** बेकायदेशीररित्या तलवार बाळगल्याप्रकरणी सागर हुसेन याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्टील मार्केटमधील गल्ली नंबर दोन येथे एक इसम संशयितरित्या घुटमळत असलेला पोलिसांना दिसला. त्याला हटकले असता तो पळून जाण्याचे तयारीत होता. यावेळी पोलिसांनी त्याला पकडले. त्याने त्याचे नाव सागर समीम हुसेन असे सांगितले. त्याच्याकडे पोलिसांना तलवार सापडून आली.

## ‘झाडांची कत्तल करू नका’

**अलिबाग :** होळी सणानिमित्त झाडांची कत्तल होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने गाव पातळीवर बैठका घेऊन वनविभागामार्फत जनजागृती करण्यास सुरुवात केली आहे. झाडांच्या कत्तलीमुळे पर्यावरण व जंगलातील प्राण्यांवर होणाऱ्या परिणामाची माहिती देण्याचे काम वन विभागामार्फत करण्यात आले आहे. होळीमध्ये वणवे लागण्याची शक्यता आहे. वणवे रोखण्यासाठी नागरिकांनी होळी काळजीपूर्वक पेटवा, पर्यावरणपूरक होळी साजरी करा असे आवाहन अलिबागचे वनक्षेत्रपाल नरेंद्र पाटील यांनी केले.

# जंगलातील प्राण्यांना मिळणार पाणी

## ■ वन्य जीवांच्या सुरक्षेसाठी उपवनसंरक्षक सरसावले

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यात तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या वाढत्या तापमानामुळे पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. जंगलातील प्राण्यांना पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये या म्हणून त्यांच्या सुरक्षेसाठी अलिबागचे उपवनसंरक्षक राहूल पाटील सरसावले आहेत. पशु, पक्षांना पिण्यासाठी वेगवेगळ्या पध्दतीने पाणवठयांद्वारे पाणी उपलब्ध करण्याच्या सूचना वनक्षेत्रपालांना दिल्या आहेत. त्यामुळे जंगलातील प्राण्यांचा पाण्याचा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे.**



जिल्ह्यात उन्हाच्या झळा प्रकर्षाने जाणवू लागल्या आहेत. पक्षी व प्राण्यांच्या अंगाची लाहीलाही होण्याबरोबरच जीव कासावीस होण्याची भीती अधिक आहे. त्यामुळे जंगलांत साधारणतः दरी, डोंगराच्या खालील भागांत खड्ड्यामध्ये नैसर्गिकरित्या पाणी साठलेले असते. लहान- मोठे ओहोळ, डबकी, नाले नद्यांमध्ये पाणी आढळते. या पाण्याचा आधार घेऊन उन्हाळ्यात प्राणी व पक्षी तहान भागवितात. पाण्याची पातळी कमी झाल्याने मार्च अखेरील जंगलातील प्राणी, पक्षी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नैसर्गिक पाण्याचे झरे, डबके, पाणवठे साधारणतः एप्रिल व मेमध्ये आटल्यानंतर पशुपक्षी, प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते. ही समस्या कायमची सोडविण्यासाठी अलिबागचे उपवनसंरक्षक राहूल पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. जंगलातील प्राणी, पक्षांना जंगलातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी ते सरसावले आहेत.

> उन्हामुळे पाणवठ्यांमधील पाणी कमी होऊ लागले आहे. पाण्याच्या शोधात जंगलातील प्राणी लोकवस्तीत येण्याची भिती अधिक असते. त्यामुळे जंगलातच पाणवठ्यांद्वारे प्राण्यांना पाणी उपलब्ध व्हावे यासाठी टँकर व अन्य माध्यमातून पाणी पुरवठा करण्याच्या सूचना वनक्षेत्रपाल यांना दिल्या आहेत. तसेच काही संस्थांनादेखील आवाहन केले आहे. हा प्रयत्न खऱ्या अर्थाने यशस्वी होईल असा विश्वास आहे.
>
> राहूल पाटील
> उपवनसंरक्षक

### प्राणीप्रेमींना आवाहन

**स्वयंसेवी संस्था, सुजाण नागरीक, प्राणी प्रेमींना यांनी याबाबत पुढाकार घेऊन नैसर्गिक पाणवठांचा आधार घेऊन तेथे पाण्याचा साठा साठविण्यासाठी उपाययोजना केल्यास, पशु-पक्षी-प्राणी यांचा जीव वाचू शकेल, त्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन वनविभागाचे उपवनसंरक्षक राहूल पाटील यांनी केले आहे.**

वन विभागामार्फत बांधण्यात आलेले वनबंधारे, वनतळे, पाणवठयांमध्ये मे अखेरपर्यंत काही प्रमाणात पाणी असते. पाण्याअभावी मृत्यू होणाऱ्या पशु, पक्षांचा जीव वाचविण्यासाठी जंगलातील ज्या जागांमध्ये पाण्याचे नैसर्गिक स्रोत उपलब्ध नाही, अशा ठिकाणी पाणवठे निर्माण करुन टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यामुळे जंगलातील प्राण्यांचा पाण्यांचा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे.

# चित्रलेखा पाटील यांनी घेतली प्रमोद भायदे यांची भेट



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मुरुड नगर परिषदेचे माजी नगरसेवक व ज्येष्ठ शिवसैनिक, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेची धुरा समर्थपणे सांभाळणारे अलिबाग मुरुड विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक प्रमोद भायदे यांची शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी मुरुड येथील कार्यालयात सदिच्छा भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी शेकापचे मुरुड तालुक्यातील जेष्ठ नेते तुकाराम पाटील, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघाचे अध्यक्ष, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक विजय गिदी, शेकाप पुरोगामी युवक संघटनेचे अलिबाग तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे, शेकापचे अमोल पाटील, राहील कडू, फुगांवकर, अमोल मिठागरी तसेच शेकाप व शिवसेनेचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाताळगंगेला प्रदूषणाचा विळखा

**रसायनी :** पाताळगंगा नदी जिल्ह्यातील प्रमुख नद्यांपैकी एक आहे. नदीतील प्रदूषण वाढत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेकदा नदीपात्रात मासे मृत होण्याच्या घटना समोर आल्या आहेत.प्रदूषणामुळे पाण्याचा रंगही बदलल्याचे दिसते. नदीचे प्रदूषण वाढण्याची कारणे अनेक आहेत.औद्योगिक क्षेत्रातील अनेक कंपन्यांमधून छुप्या मार्गाने मोठ्या प्रमाणावर रसायन मिश्रित सांडपाणी नदीत सोडण्यात येते. खोपोली शहरातील हजारो लिटर सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न होता थेट नदीत सोडले जाते त्यामुले पाताळगंगा नदीचे प्रदूषण वाढतच आहे.

## निवडणुकीच्या पार्श्‍वभूमीवर ‘ऑल आऊट’ मोहीम

**। पनवेल । वार्ताहर ।**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्‍वभूमीवर पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशाने पनवेल शहर पोलिसांनी त्यांच्या हद्दीमध्ये मिशन ऑल आऊट मोहीम राबवून मोठ्या प्रमाणात धडक कारवाई केल्याने अवैद्य धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

परीमंडळ २ चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, पोलीस निरीक्षक प्रवीण भगत व इतर सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मिळून मोठ्या प्रमाणात हद्दीमध्ये मिशन ऑल आऊट मोहीम राबवली. त्यामध्ये त्यांनी आझाद नगर झोपडपट्टी येथून राजू दास या इसमास ताब्यात घेऊन त्याच्या कडून जवळपास एक किलो गांजा हस्तगत केला. त्याचप्रमाणे अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ८ जणांवर कारवाई करण्यात आली. तसेच करंजाडे येथून आरोपी आर्यन सैनी याला सरा हस्तगत केला, तसेच देशी विदेशी दारूचा मुद्देमाल ७ इसमांकडून हस्तगत केला आहे. यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## महामानवाला अभिवादन

**तळा :** चवदार तळे सत्याग्रहाच्या ९७ व्या वर्धापनदिनी तळा तालुक्याच्या वतीने चवदार तळे महाड येथे महामानवाला अभिवादन बुधवारी (दि.२०) करण्यात आले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या श्रामणेर / बौद्धाचार्य शिबिर व महिला उपासिका धम्म प्रशिक्षण शिबिरातील शिबिरार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तळा तालुक्यातून मालूक व तळा शहर येथे आयोजित केलेल्या महिला उपासिका धम्म प्रशिक्षण शिबिरातील २९ शिबिरार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

# पाण्यासाठी शेकापची सिडकोकडे मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

खांदा कॉलनी, नवीन पनवेल आणि कळंबोली परिसरातील पाणी पुरवठा सुरळीत करण्याची शेतकरी कामगार पक्षाने सिडकोचे अधिकारी बी. वी. गायकवाड यांची भेट घेऊन मागणी केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून खांदा कॉलनी, नवीन पनवेल आणि कळंबोली परिसरात सिडकोद्वारे केला जाणारा पाणी पुरवठा पूर्णतः बंद आहे.

पाणी पुरवठ्याची पाईपलाइन फुटल्याने त्याच्या दुरुस्तीसाठी पाणीपुरवठा बंद केला आहे. याबाबत सिडकोने घेतलेल्या शटडाऊनचा वेळ संपून देखील



अद्याप पाणीपुरवठा सुरळीत झाला नसल्याने शेकापने याबाबत पाणीपुरवठा अधिकाऱ्यांची भेट घेत पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

सिडकोने हाती घेतलेले दुरुस्तीचे काम बुधवारी (दि.२०) सकाळी ८ वाजेपर्यंत पूर्ण झाले आहे.

२४ तास उलटूनही अद्याप या तीनही ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत पनवेल झालेला नसल्याने सोसायट्यांमधील रहिवाशांना स्वखर्चाने टँकरद्वारे पाणी घ्यावे लागत आहे.

यासाठी सिडकोच्या पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता गायकवाड यांची भेट घेऊन शेकाप कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी निवेदन दिले. यावेळी माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, परिवर्तन सामाजिक संस्थेचे कार्यालयीन सचिव प्रकाश पाटील उपस्थित होते.

# कर्जत येथे महिला शेतकऱ्यांचा सन्मान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

युनायटेड वे मुंबई संस्थेचे माध्यमातून आणि ओवेन्स कोर्निंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड अर्थसहाय्यीत, समग्र ग्राम विकास कार्यक्रम तसेच जल संजीवनी प्रकल्प कर्जत अंतर्गत पाथरज ग्रामपंचायत येथील मार्गाचीवाडी जांभूळवाडी येथे शेतकरी महिला यांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन केले होते. गावात उत्तम कामगिरी करणाऱ्या स्वयं सहायता गटांचे सत्कार सन्मान चिन्ह देऊन करण्यात आले.



युनायटेड वे मुंबई ही संस्था मशरूम उत्पादन, रोपवाटिका, शेळीपालन, कुक्कुटपालन, गांडूळखत निर्मिती प्रकल्प, शिवणकाम अशा विविध रोजगाराभिमुख उपक्रम राबवीत आहे. उपक्रम राबविण्यामागचा उद्देश हा महिला स्वयंसहाय्यता समूहच्या माध्यमातून फक्त बचती पुरते मर्यादित न राहता व्यवसायाभिमुख प्रशिक्षित करून रोजगार निर्मितीद्वारे त्यांचे जीवनमान उंचावणे आहे. महिला दिनाच्या कार्यक्रमात आदिवासी दुर्गम भागातील पाथरज, खांडस, अंभेरपाडा, नांदगाव आणि वारे ग्रामपंचायत मधील एकूण १२ गावातील १९ गटातील १३६ महिलांच सहभाग आहे. संस्था राबवीत असलेल्या संकल्पनेची प्रशंसा केली.

या प्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्र, कशेळे शाखेच्या व्यवस्थापिका अश्विनी गजभिये, बँक सखी आशा निकाळजे, प्रकाश नर्सरीच्या संस्थापिका नयना कीर, हर्षदा जाधव सरिता ऐनकर, सुरेखा ऐनकर, संगीता थोराड, कविता काठे, राजश्री तिटकारे, यशोदा ऐनकर या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोएब दाऊदी यांनी केले तर आभार विवेक कोळी यांनी केले.

कृषी अभियंता निवृत्ती गुडेकर, गायत्री ऐनकर, श्वेता जाधव, जयश्री ऐनकर, संतोष काठे, दिपक कवठे, अमर पारधी, जगदीश भला आणि प्रमोद धादवड आदींनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## अनधिकृत धाबे जमीनदोस्त

**पनवेल :** तळोजा फेज दोन वसाहतीत सिडकोच्या भूखंडांवर अतिक्रमण करून उभारण्यात आलेले पाच अनधिकृत धाबे सिडकोकडून जमीनदोस्त करण्यात आले आहेत. तळोजा फेज दोन वसाहतीत सिडकोच्या गृहनिर्माण सोसायटीलगत असलेल्या मोकळ्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम करण्यात आले होते. तळोजा वसाहतीलगत असलेल्या मुख्य रस्त्यावर हॉटेल बागबान, शालिमार, पटेल, संसार व स्टार प्लॅनेट आदी धाबे विटा, पत्रे टाकून अनधिकृत उभारण्यात आले होते. सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने ही बांधकामे जमीनदोस्त केली. दरम्यान, सिडकोची कारवाई होणार असल्याची माहिती मिळताच तळोजा फेज एक आणि दोनमधील फेरीवाल्यांनी दुकाने ने बंद ठेवली होती. तर येथील अनधिकृत दुकानांवर देखील कारवाई करण्याची मागणी होत आहे.



● पनवेल बाजार पेठेत होळीनिमित्त विविध रंगाच्या साखरेच्या गाठी खरेदी करताना नागरिक.
(छायाचित्र : राजेश डांगळे)

## ऑर्किड फुलांच्या शेतीचा यशस्वी प्रयोग

# शिक्षक महिला बनली शेतकरी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**थंड हवेच्या प्रदेशात ऑर्किड महागड्या समजल्या जाणाऱ्या फुलांना बहर येत असतो. मात्र, कर्जत सारख्या काहीशा उष्ण तापमानाच्या प्रदेशात पॉलीहाऊसमध्ये ऑर्किड फुलांची शेती केली आहे. आपली आवड जपण्यासाठी पेशाने शिक्षिका असलेल्या महिला शेतकरी यांनी शिक्षकी नोकरी सोडली शेतीमध्ये आपले पाय घट्ट रोवले आहेत. दरम्यान, कर्जतमधून आठवड्याला ऑर्किडची फुले दादर येथील फुल बाजारात जाऊ लागली आहेत आणि कर्जतमध्ये ऑर्किड देखील फुलते हे सिद्ध झाले आहे.**



फुलांची आवड असलेल्या निरुपमा मोहन यांनी कर्जत कृषी अधिकारी यांचा सल्ला घेतला आणि एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानमधून हरित गृह बांधण्यासाठी अनुदान मिळावे म्हणून शासनाच्या पोर्टलवर ऑनलाईन माहिती भरून प्रतीक्षा केली. जानेवारी २०२३ मध्ये वेणगाव येथील जमिनीमध्ये २० गुंठे क्षेत्रात पॉलीहाऊस उभारून घेतले.

ऑर्किड फुलांची शेती करण्यासाठी अनेकांच्या सल्लानंतर पुणे येथील राईज एन शाईन या कंपनीबरोबर करार करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ऑर्किड फुलांचे कंद आणून त्यांची लागवड सुरू केली. चार महिन्यांनी ऑर्किडची तब्बल १९ हजार कंद यांची लागवड नारळाच्या लोंब्या यांच्यात करण्यात आली. सुधारित प्रकारे मातीमध्ये लागवड न करता ते कंद जमिनीवर तीन फूटवर जीआय पाईप यांच्या साहाय्याने उभारलेल्या बेडवर करण्यात आली. त्याच्या बाजूने खते आणि किटकनाशक यांचा वापर करण्यासाठी ठिंबक सिंचन वाहिन्या जोडण्यात आल्या.

महिला शेतकरी निरुपमा यांच्या शेतातून जानेवारी महिन्यापासून ऑर्किड फुले मुंबईमधील फुल बाजारात विक्रीसाठी नेली जात आहेत. लग्न समारंभ आणि उत्सव यांच्या काळात या फुलांना मोठी मागणी असते. सध्या आठवड्यातून एकदा फुलांचे ताटवे प्लास्टिकमध्ये पॅक करून मुंबईमध्ये नेण्यात येत आहेत. कर्जत सारख्या काहीशा उष्ण हवामानाच्या प्रदेशात पॉलीहाऊस मध्ये ऑर्किडची शेतीचा यशस्वी प्रयोग सिध्द झाला आहे.

> **आम्ही ही शेती करू लागल्यावर मुंबई बाजारात फुलांची विक्री कशी होते हे पाहून घेतले आहे .आम्ही फुलांचे गुच्छ देखील बनवून घेतो आणि मोठ्या प्रमाणात दादर फुल बाजारात मालाची विक्री करतो. कृषी अधिकारी यांचे योगदान या शेतीसाठी महत्वाचे असून सतत मार्गदर्शन केले जात असून त्यांच्यामुळे प्रकल्प यशस्वी होत आहे.**
>
> **-निरुपमा मोहन**

# महावितरणच्या पथकाला मारहाण

**। कल्याण । प्रतिनिधी ।**



थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित करताना महावितरणच्या पथकाला मारहाण करण्याची घटना भिवंडी तालुक्यातील पाच्छापूर येथे गुरुवारी (दि.२१) घडली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध पडघा पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा व मारहाण केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

अनिकेत बाळाराम जाधव (रा. पाच्छापूर, ता. भिवंडी) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. जाधव या ग्राहकाचे वीजबिल थकीत असल्याने अंबाडी शाखेचे वरिष्ठ तंत्रज्ञ कुशल काकडे यांच्या पथकाने जाधव यांचा वीजपुरवठा खंडित करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी जाधव यांचा मुलगा अनिकेत याने वरिष्ठ तंत्रज्ञ काकडे व त्यांच्या समवेतच्या सुरक्षा रक्षकाला दमदाटी व मारहाण केली. काकडे यांच्या फिर्यादीवरून पडघा पोलिसांनी सरकारी कामात अडथळ्यासह आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महावितरण कर्मचाऱ्यांना मारहाण व दमदाटीच्या गुन्ह्यात जबर शिक्षेची तरतूद आहे. सध्या मार्च अखेरमुळे कर्मचारी थकबाकीदांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करत आहेत. या कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा न आणता त्यांना सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# भाजपची भीती आणि गुर्मी

नरेंद्र मोदी सरकार बेभान झाले आहे. एका बाजूला ते घाबरले आहे. लोकसभा निवडणुकीत चारशे जागा मिळणे अशक्य आहे हे त्याला कळून चुकले आहे. दुसऱ्या बाजूला त्याची गुर्मीही गेलेली नाही. आपण काय वाटेल ते केले तरी जनता आपल्यालाच पाठिंबा देत राहील, असे त्याला वाटते. अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या प्रकरणातून मोदींची भीती आणि माज दोन्हींचे दर्शन होते. अन्यथा, निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना इडीचा इतका बेलगाम वापर करण्याचे धाडस त्यांच्या सरकारने दाखवले नसते. स्वतंत्र भारताच्या इतिहासात ज्या गोष्टी घडल्या नाहीत त्या आपल्या कारकीर्दीत झाल्या असा दावा मोदी नेहमी करत असतात. गेल्या ७५ वर्षात, आणीबाणीचा थोडाफार अपवाद वगळता, केंद्र सरकारने सीबीआय इत्यादींना गुंड टोळ्यांप्रमाणे असे वापरून घेतले नव्हते. आता केंद्र सरकारची इडी आणि सुपारी देऊन काटा काढणारी एखादी गुंड टोळी यांच्यात काही फरकच उरलेला नाही. गेल्या काही वर्षांपासून या इडीने भारतात कहर केला आहे. वास्तविक किमान शंभर कोटी वा त्यावरचे पैशांचे अपहार ज्यात गुंतलेले असतात अशीच प्रकरणे केवळ ईडीकडे सोपवली जात असतात. पण विरोधी पक्ष किंवा मोदींना विरोध करणारे कार्यकर्ते यांच्यावर कोणत्याही प्रकरणात इडीकरवी धमकी दिली जाते. महाराष्ट्रात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या जवळच्या सर्व नेत्यांना इडीचा सामना करावा लागलेला आहे. केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष भाजपच्या नाकावर टिच्चून दिल्लीमध्ये गेली दहा वर्षे राज्य करीत आहे. लागोपाठच्या दोन विधानसभा निवडणुकीमध्ये आम आदमी पक्षाने अभूतपूर्व यश मिळवले. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे भाजपचा त्याने पार सफाया केला. दोन वर्षांपूर्वी दिल्ली शहरात येणाऱ्या तीनही महानगरपालिकांमधील सत्तादेखील आपने भाजपकडून खेचून घेतली. त्याचवेळी गुजरातमध्येही त्याने मोदींना थेट आवाज देण्याचा प्रयत्न केला व विधानसभेत त्यांना चांगली मते मिळाली.

### आम आदमी पक्षाचे आव्हान

पंजाब विधानसभेत प्रचंड यश मिळवल्यावर आपला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला. हरियाणा तसेच इतर छोट्या राज्यांमध्ये हातपाय पसरण्याची तयारी त्याने केली. दिल्लीमध्ये सरकारी शाळांचा दर्जा इतका चांगला झाला की त्या खासगी शाळांशी स्पर्धा करू लागल्या. सार्वजनिक दवाखानेही सुधारले. याखेरीज दिल्लीवासियांना स्वस्त पाणी व वीज मिळू लागली. याच जोरावर त्यांना दिल्लीच्या जनतेत मोठा पाठिंबा मिळतो आहे. ३७० वे कलम रद्द करणे, अयोध्येतील राममंदिर इत्यादी काही मुद्द्यांवर भाजपच्या भूमिकेचे समर्थन करण्याचा धूर्तपणाही त्यांनी दाखवला. त्यामुळे धर्माबद्दल हळवा असलेल्या उत्तर भारतीय मतदाराला त्यांनी धरून ठेवले. केजरीवाल हे मूळचे हरियाणातील बनिया आहेत. उत्तर भारतीय मानस त्यांना चांगले कळते. त्याला अपील करू शकण्याची त्यांची क्षमता आहे. परिणामी, भाजपला केजरीवाल हे भविष्यकाळातील धोका वाटतात. त्यामुळेच या पक्षावर घाला घालण्याचे प्रयत्न आरंभापासून चालू आहेत. दिल्ली हे पूर्ण राज्य नाही. तेथील नायब राज्यपालांना मोठे अधिकार असतात. ते प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमध्ये हस्तक्षेप करू शकतात. तसेच सरकारची धोरणे रोखू शकतात. दिल्लीत सरकार चालवण्यात बिब्बा घालणारे असेच नायब राज्यपाल भाजपने सतत नेमले व त्यांच्याकरवी केजरीवाल सरकारला त्रास देण्याचा प्रयत्न झाला. यावरून प्रकरणे न्यायालयात गेली. तेथे केजरीवाल यांचा विजय झाला. त्यामुळे मग दारू प्रकरण बाहेर काढण्यात आले. केजरीवाल सरकारने अबकारी धोरणामध्ये मध्यंतरी काही बदल केले. हे बदल काही मूठभर दारू उत्पादकांच्या फायद्यासाठी राबवण्यात आले असे भाजपचे म्हणणे आहे. या धोरणाच्या बदल्यात दारुच्या धंदेवाल्यांकडून आम आदमी पक्षाने कोट्यवधी रुपयांची लाच मिळवली व हाच पैसा गोवा, पंजाब इत्यादी निवडणुकीत वापरण्यात आला असा आरोप आहे. या प्रकरणामध्ये उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना गेल्या वर्षी फेब्रुवारीत तर खासदार संजयसिंग यांना गेल्या ऑक्टोबरात अटक करण्यात आली आहे. त्यांना जामीन मिळू नये यासाठी इडी वेगवेगळी कलमे लावून सातत्याने कोर्टात वेगवेगळे आरोप करीत आहे.

### बाजी उलटू शकते

इतर नेत्यांनंतर केंद्राचे लक्ष्य केजरीवाल आहेत हे स्पष्ट झाले होते. त्यांना नऊ समन्स धाडण्यात आली होती. केजरीवाल यांनी चौकशीला हजर राहण्यास नकार दिला होता. ही समन्स बेकायदा आहेत असे त्यांचे म्हणणे होते व त्यांना आव्हान देणारी याचिका त्यांनी न्यायालयात दाखल केली होती. त्याची सुनावणी २२ एप्रिल रोजी होणार होती. मात्र त्या सुनावणीची वाट न पाहता इडीने केजरीवाल यांना अटक केली. त्याचे टायमिंगही पाहण्यासारखे आहे. निवडणूक रोख्यांचा सर्व तपशील जाहीर करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने स्टेट बँकेला दिला होता. कोणत्या पक्षाला किती निधी मिळाला व तो नेमका कोणी दिला हे गुरुवारी कळणार होते. त्याच संध्याकाळी केजरीवाल यांना ताब्यात घेण्यात आले. त्यामुळे माध्यमांमध्ये रोख्यांच्या बातम्या बाजूला पडून केजरीवाल झळकू लागले. कहर म्हणजे केजरीवाल यांना या प्रकरणात मिळालेली लाच त्यांनी निवडणुकीसाठी कशी वापरली असे दावे इडीने शुक्रवारी न्यायालयात केले. भाजपच्या सरकारने इडीची भीती दाखवून किंवा अन्य मार्गांनी तब्बल आठ हजार कोटींच्या देणग्या निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून मिळवल्याचा जो आरोप होत आहे. त्यावर उत्तर न देता उलटा असा आरोप विरोधकांवर करण्याला पट्टीचा निर्लज्जपणा व बेरहमपणा असायला हवा. मोदींच्या भाजपकडे तो आहे यात शंकाच नाही. दिल्लीतील लोकसभा निवडणुका आम आदमी पक्ष व काँग्रेस एकत्र लढवत आहे. केजरीवाल यांनी इंडिया आघाडीला इतरत्र पाठिंबा दिला आहे. त्यांच्या अटकेमुळे इंडिया आघाडीचे ऐन निवडणुकीच्या हंगामात नुकसान होईल. अर्थात, केजरीवाल यांचा स्वभाव पाहता ते तुरुंगात राहण्याचे मोठे भांडवलही करू शकतात. या स्थितीचा फायदा उठवण्याची ताकद त्यांच्यात आहे. झारखंडच्या हेमंत सोरेन यांच्यापाठोपाठ इंडियाचा दुसरा मोहरा गजाआड करून मोठी बाजी मारली असे भाजपला वाटत असेल. पण ही बाजी उलटू शकते.

विचार

# बिगूल वाजला...

**जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील मतोत्सवाची घोषणा निवडणूक आयोगाने केली. सात टप्प्यांमध्ये ही निवडणूक पार पडेल. यावेळी निवडणूक रोखे घेऊन काही संस्थांना मोठी कामे दिल्याचा, केंद्रीय तपास संस्थेच्या गैरवापराचा, वाढत्या बेरोजगारीचा तसेच जात जनगणनेचा मुद्दा विरोधी पक्ष प्रभावीपणे मांडेल. त्याच वेळी गेल्या दहा वर्षांमध्ये वीज, रस्ते, पाणी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगिरीचा मुद्दा भाजप मांडेल. कशी रंगेल ही निवडणूक?**



भागा वरखडे

जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील मतोत्सवाची घोषणा निवडणूक आयोगाने केली. मतदार त्यांचे सरकार निवडण्यासाठी सज्ज झाले आहेत. वेगवेगळे प्रांत, भाषा, धर्म असले तरी मतोत्सवात कोणताही भेद न करता लोक आपले सरकार निवडत असतात. निवडणूक आयोगाने सात टप्प्यांमध्ये मतदान जाहीर केले असले तरी त्यात वावगे काही नाही. पूर्वी एकाच राज्यात दोन-तीन टप्प्यांमध्ये निवडणूक होत असे. अर्थात या वर्षी संवेदनशील नसलेल्या महाराष्ट्रामध्ये पाच टप्प्यांमध्ये निवडणुका कशासाठी, असा प्रश्न उपस्थित झाला. १९ एप्रिल ते एक जूनदरम्यान सात टप्प्यांमध्ये मतदान आणि चार जून रोजी मतमोजणी होणार आहे. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये सातही टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे. उत्तर प्रदेश हे मोठे राज्य असल्याने तिथे जादा टप्पे असणे समजू शकते; परंतु बिहार, पश्चिम बंगालमध्ये महाराष्ट्रापेक्षा लोकसभा मतदारसंघांची संख्या कमी असतानाही जादा टप्पे कशासाठी या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यामुळे तर सात टप्प्यांमधील निवडणुकीवर आक्षेप घेतला. आयोग लोकसभेबरोबरच चार राज्यांच्या निवडणुका घेत असताना गेल्या पाच वर्षांपासून लोकशाहीच्या मंदिराचे दरवाजे खुले होण्याची वाट पाहत असलेल्या जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये निवडणुका घेण्याचे का टाळले, हे ही स्पष्ट व्हायला हवे. सुरक्षेचे कारण असेल तर तिथेही तीन-चार टप्पे करता आले असते. सरकारची इच्छाशक्ती निवडणूक आयोगाने महत्त्वाची मानली असावी. असे असले तरी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढच्या सहा महिन्यांमध्ये तिथे विधानसभेची निवडणूक घ्यावीच लागणार आहे.

निवडणूक आयोगाने आंध्र प्रदेश, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश आणि ओडिशा या राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. आंध्र प्रदेशमध्ये १३ मे रोजी, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीममध्ये १९ एप्रिलला आणि ओडिशामध्ये १३ आणि २० मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकांमध्ये प्रथमच ८५ वर्षांवरील लोकांव्यतिरिक्त ४० टक्के किंवा त्याहून अधिक अपंगत्व असलेल्या लोकांना घरबसल्या मतदान करता येणार आहे. लोकशाही प्रक्रियेत आपल्या मताचे सरकार येण्यासाठी मतांच्या या उत्सवात सहभागी होता यावे, म्हणून निवडणूक आयोग करत असलेल्या प्रयत्नांना सुजाण नागरिकांनी सहकार्य करायला हवे. सरकारविषयीच्या उदासीनतेने मतदानाकडे न फिरकण्याचे आणि सुटीच्या दिवशी मौज करण्याची वृत्ती सोडून द्यायला हवी. पाच वर्षांपूर्वीच्या तुलनेत येत्या लोकसभा निवडणुकीत सात कोटी नवमतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. ईव्हीएमवर मतदान होणार आहे. ईव्हीएमबाबत अनेक लोकांच्या मनात शंका आहेत; परंतु आता सर्वोच्च न्यायालयानेही याबाबतची याचिका फेटाळली आहे. या निवडणुकीत ५५ लाख ईव्हीएमचा वापर करण्यात येणार असून १०.५ लाख मतदान केंद्रांवरून निवडणुका घेण्यात येणार आहेत. लोकांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी व्हीव्हीपॅटचा वापर वाढवणे आवश्यक आहे. ४९.७२ कोटी पुरुष, ४७.१५ कोटी महिला आणि ४८ हजारांहून अधिक तृतीयपंथी मतदार मतदान करणार आहेत.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपने अनुक्रमे २८२ जागा ३०३ जागा जिंकून चांगली कामगिरी केली. काँग्रेसने २०१४ मध्ये ४४ आणि २०१९ मध्ये ५२ जागा जिंकल्या. देशात अजूनही काही मूलभूत समस्या आहेत. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार आदी मुद्दे असले तरी या निवडणुकांमध्ये राम मंदिराचा मुद्दा महत्वाचा ठरणार आहे. भाजप नेत्यांनी विविध भागातील भाविकांना अयोध्यावारी घडवली आहे. राजकीय पक्षांना गोपनीय देणग्या देणाऱ्या इलेक्टोरल बाँड योजनेवर सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारीमध्ये बंदी घातली. 'ईडी', 'सीबीआय' प्राप्तिकर खाते यासारख्या संस्थांच्या छाप्यानंतर तसेच निवडणूक रोखे घेतल्याचे आणि निवडणूक रोखे घेतल्यानंतर काही संस्थांना मोठमोठी कामे दिली गेल्याचे आढळल्यामुळे हा कथित गैरव्यवहाराचा मुद्दा विरोधकांच्या आयता हाती आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्टेट बँकेकडून तपशीलवार माहिती मागवली; परंतु आता निवडणूक जाहीर झाल्याने ही माहिती मिळण्याची शक्यता धूसर झाल्याने भाजपला हायसे वाटले असेल. निवडणूक देणगी देणाऱ्या कंपन्यांना भाजपने कोणता फायदा दिला किंवा त्यात काही प्रकारची अनियमितता असल्याचे पुढे आले, तर निवडणुकीत तो मोठा मुद्दा बनू शकेल. गेल्या दहा वर्षांमध्ये झालेल्या विकासाचा मुद्दाही भाजप निवडणुकीदरम्यान उच्च रवाने मांडणार आहे. वीज, रस्ते, पाणी, तंत्रज्ञान या क्षेत्रात गेल्या दहा वर्षांमध्ये सरकारने केलेल्या कामगिरीचा निवडणुकीच्या वेळी जोरदार प्रचार केला जाईल. केंद्रीय तपास संस्थेच्या गैरवापराचा मुद्दा विरोधी पक्ष प्रभावीपणे मांडेल.

सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या एका याचिकेनुसार, २००४-१४ दरम्यान 'सीबीआय'ने तपास केलेल्या ७२ राजकीय नेत्यांपैकी ४३ विरोधी पक्षातील होते. हे प्रमाण साठ टक्क्यांपेक्षा कमी होते. आता हेच प्रमाण ९५ टक्क्यांहून अधिक झाले आहे. हाच प्रकार 'ईडी'च्या बाबतीतही दिसतो. चौकशी केलेल्या राजकारण्यांमध्ये विरोधी नेत्यांचे २०१४ मध्ये असलेले ५४ टक्क्यांचे प्रमाण ९५ टक्के झाले आहे. राजकीय पक्षांमध्ये घराणेशाहीच्या मुद्द्यावरून राजकीय लढाई सुरू आहे. एकीकडे भाजप विरोधक घराणेशाहीचे राजकारण करत असल्याचा आरोप केला जातो; मात्र भाजपनेही घराणेशाही सुरू केली आहे. निवडणुकीपूर्वी विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या घरांवर छापे टाकून सापडलेल्या नोटांच्या बंडलांचा उल्लेख खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या भाषणात करत आहेत. त्याचबरोबर विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच छापे टाकले जातात, असा आरोप विरोधक सातत्याने करत आहेत. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांनाच भाजपने पवित्र करून घेतले. विरोधी पक्ष निवडणुकीदरम्यान बेरोजगारीचा मुद्दा आवर्जून मांडू शकतात. नोकरभरती परीक्षेतील पेपरफुटीचा मुद्दाही विरोधकांकडून निवडणुकीदरम्यान उपस्थित केला जाणार आहे. अर्थात हा मुद्दा भाजपप्रमाणेच विरोधकांसाठीही अडचणीचा ठरणार आहे. राहुल गांधी यांच्यापासून तेजस्वी यादव आणि अखिलेश यादव यांच्यापर्यंत बहुतांश विरोधी नेते जात जनगणनेचा मुद्दा मांडत आहेत. निवडणुकीच्या काळातही विरोधक या मुद्द्यावर भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करतील. मोदी मात्र देशात गरीब, शेतकरी, महिला आणि तरुण या चारच जाती असल्याचे सांगत आहेत. हे दावे-प्रतिदावे आता रंगतील.

विरोधी पक्षांमध्ये एकजुटीचा अभाव आणि भाजपच्या कथनाविरुद्ध इतर कोणतेही कथन मांडण्याची असमर्थता यामुळेही विरोधकांचा दावा कमकुवत होतो. निवडणूक घेताना आयोगासमोर चार मोठी आव्हाने असतील. त्यात गुंडशक्ती, काळ्या पैशांचा वापर, डिजिटल वॉलेटद्वारे संशयास्पद व्यवहार, संसाधनचा गैरवापर आदी आव्हाने आहेत. 'सोशल मीडिया'वर टीका करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे; पण खोट्या बातम्या पसरवून अराजकता निर्माण होऊ शकते. 'एनडीए' आणि 'इंडिया' आघाडीतील मुख्य लढत नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्यामध्ये व्हावी, असा भाजपचा प्रयत्न आहे. 'एनडीए' आघाडी तिसऱ्यांदा मोदी यांचा चेहरा घेऊन निवडणूक लढवणार आहे, तर 'इंडिया' आघाडीमध्ये अद्याप कोणत्याही चेहऱ्यावर एकमत झालेले नाही. राष्ट्रीय पक्षांमध्ये, बहुजन समाज पक्ष वगळता सर्व पक्ष कोणत्या ना कोणत्या आघाडीचा भाग आहेत. ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस, मायावतींचा बहुजन समाज पक्ष आणि नवीन पटनायक यांचा बिजू जनता दल कोणत्याही आघाडीत सामील होत असल्याची घोषणा आतापर्यंत झालेली नाही. भारतीय मतदारांना गृहीत धरून चालणार नाही. मतचाचण्यांना चकवा देऊनही त्यांनी यापूर्वी निवडणुकीचा निकाल दिला आहे. मतदार फक्त सक्षम पर्याय शोधत असतो. तो मिळाला नाही, तर तो बदल स्वीकारत नाही, हे निवडणुकीच्या निकालाचे इंगित असते.

आजकाल

# जागतिक जल दिन- पाण्याचे वास्तव

सोमिनाथ घोळवे

१९९३ पासून २२ मार्च हा दिवस ''जागतिक जल दिन'' साजरा केला जातो. पण पाण्याचे वास्तव काय आहे, हे समजून घेणे अवश्यक आहे.

पाण्याला रंग नाही, पाण्याला चव नाही, पाणी पारदर्शक आहे. तरीही सद्यस्थितीत शहरांमध्ये नाहीतर खेड्यांमध्ये देखील पाणी विक्रीतून भयंकर असे अर्थकारण उभे राहिलेले आहे. मला आठवते, मी लहान असताना आजोबा गोष्टी सांगत होते. एका गोष्टीत त्यांनी खाद्यपदार्थांची गोष्ट सांगताना म्हणाले की, ''पिंगळा म्हणाला की मिरची कागदाच्या पुढीत,तर पाणी बाटलीत येईल.....'' सद्यस्थितीत असेच दिसून येत आहे. सर्वत्र पाणी विक्री मोठ्या जोमात चालू आहे. यात राजकीय नेतृत्व आणि त्याचे कार्यकर्ते यांचे मोठे अर्थकारण गुंतलेलं आहे. त्यामुळंच पाणी पुरवठ्याच्या मागणीला फारसे गांभीर्याने घेतले जात नाही. पाणी पुरवठ्याच्या बाबतीत उदासीनता दाखवली जात आहे.

गेल्या तीन दशकांपासून विविध भागात पिण्याच्या पाण्याचा बदललेला रंग आणि चव असे दोन्ही बदलले आहे. या दोन्हीने व्यापारी रूप धारण केले आहे. अर्थात वॉटर प्युरिफायरची मोठी बाजारपेठ निर्माण झाली आहे. दुष्काळात तर या पाणी बाजारपेठेला तेजी (जास्त मूल्य) येते. तर रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) सिस्टीमने पाण्याचे मार्केट पहिल्या क्रमांकावर येते का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. हा बाजार गेल्या दशकात दुप्पट झाला असावा. पुढील काही वर्षात कित्येक पट्टीने वाढेल हे सांगता येत नाही.

पाण्याच्या या वाढत्या बाजारपेठेने तळागाळातील वर्गामध्ये मोठ्या चिंताही निर्माण केल्या आहेत. आरओ हे खनिज मुक्त पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे साधन बनले आहे. खरंच तसे असते का? हा प्रश्न आहेच. एकंदर व्यावसायिक आरओ प्लांट्सपासून ते घरगुती आरओ प्लांट्सपर्यंतच्या पाण्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह आहे.

या संदर्भात एक उदाहरण पाहण्याचे झाले तर गाव पातळीवरील पाहता येईल. खेड्यात जागोजाग व्यावसायिक आरओ (रिव्हर्स ऑस्मोसिस) प्लँट सुरू आहेत. या प्लँटमधून किती हजार लिटर फिल्टर केलेले पाणी घरोघर पोहचत आहे. हे पाणी किती असेल सांगणे कठीण होवून बसले आहे. कारण यांच्या नोंदी प्रशासनाने ठेवल्या आहेत का? हे अजून तरी उघड झालेले नाही. आकडेवारी समोर आली नाही. पाण्याच्या अर्थकारणामुळे पाणी पुरवठ्याची मागणी होऊनही पाणी टँकरने पाणी मिळणे कठीण होऊन बसले आहे. ऐवढेच नाही तर नळ योजनेत देखील पाणी येणे कठीण झाले आहे. एकंदर आरओ पाणी व्यापार आणि हितसंबंधांचे व्यवहार समजून घेणे आवश्यक आहे. एक उदाहरण. बीड जिल्ह्यातील; एका गावामध्ये १२ वर्षांपासून व्यावसायिक प्लांट उभारून आरओ थंड पाण्याची विक्रीसाठी पाण्याची नासाडी चालू आहे. पाणी शुद्ध करण्यासाठी ही नासाडी करत आहोत याची जाणीव विक्री करणाऱ्याला असते.

माझी ज्या व्यक्तीशी चर्चा झाली, त्यांनी सांगितले की, मध्यम वर्गातून शुद्ध पाण्याला प्रचंड मागणी असल्याने त्यांनी या व्यवसायात पाऊल ठेवले आहे. मध्यम वर्गाचे पाहून तळागाळातील वर्गाला हळूहळू पाणी विकत घेणे भाग पडायला लागले आहे. सद्यस्थितीत हा व्यक्ती ३९५ ग्राहकांना दररोज ३००० ते ३५००-लीटर आरओ पाणी पुरवतात. या पाण्यासाठी त्यांना ११००० लीटरपेक्षा जास्त भूजलाचा वापर करावा लागतो. यातून २० हजार रुपये महिन्याला शिल्लक राहतात. अशीच उदाहरणे इतरही गावांमध्ये मोठ्या सापडतील. मात्र या पाणी पुरवठ्याचा ( पाणी व्यापाराचा ) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हितसंबध स्थानिक राजकीय नेतृत्वाशी आहे ही बाब देखील लक्षात घ्यावी लागते. दुसरे, खाजगी टँकर लॉबीचा पाणी व्यापार-व्यवसाय वेगात चालू आहे. मात्र सर्वसामान्यांनी मागणी करूनही टँकर चालू करण्यात येत नाही. मात्र टँकर विकत घेणार असाल तर लगेच मिळते, हे वास्तव आहे. सद्यस्थितीत सुरक्षित आणि शुद्ध पाण्याच्या उपलब्धतेशिवाय ग्रामीण परिसरात किती लोकसंख्याला शुद्ध आणि मोफत पाणी मिळत नाही याचा कधी राजकीय व्यवस्था आणि राजकीय नेतृत्व करत नाही.

मात्र निवडणुकीत पाणी पुरवठा करू अशी आश्वासने मात्र मिळत राहतात. ही आश्वासने अंधारातून पाणी विक्रीची (पाणी विकत घ्या) असे म्हणणारे असतात असे वाटू लागले आहे.

लोकसंसद

### प्रदूषित देशांच्या यादीत भारत तिसऱ्या स्थानावर

स्वित्झर्लंडमधील गोल्डच शहरातील 'आयक्यू एअर' या स्विस प्रदूषण तंत्रज्ञान कंपनीने नुकताच जागतिक वायू गुणवत्ता अहवाल २०२३ प्रकाशित केला. या अहवालानुसार भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा प्रदूषित देश ठरला आहे. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक ५० प्रदूषित शहरांपैकी ४२ शहरे एकट्या भारतातील आहेत. यापैकी निम्म्याहून अधिक शहरे बिहार आणि हरियाणा व उत्तर प्रदेश या दिल्लीला लागून असलेल्या राज्यातील असून जगभरातील सर्वाधिक प्रदूषित शहर बिहारमधील बेगुसराय हे आहे. त्यापाठोपाठ गुवाहाटी व देशाची राजधानी दिल्ली या दोन शहरांचा अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक लागतो. या शहरांशिवाय ग्रेटर नोएडा (११ वा क्रमांक), मुझफ्फरनगर (१६), गुरगाव (१७), पाटणा (२०), फरिदाबाद (२५), मीरत (२८), गाझियाबाद (३५), रोहतक (४७) या शहरांचा या यादीत समावेश आहे. भारताची प्रदूषणाची पातळी ५४.४ मायक्रोग्राम प्रति घनमीटर इतकी असून प्रमाणित मानकापेक्षा १० पटीने अधिक आहे. जगातील १३४ देशांतील ७ हजार ८१२ शहरांचा वायू प्रदूषणाच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर हे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. वायू प्रदूषणामुळे भारताचा अंदाजे १५० अब्ज डॉलर (भारताच्या जीडीपीच्या ५.४ टक्के) इतका खर्च होतो. भारतातील एकूण वायू प्रदूषणाच्या २० ते ३५ टक्के प्रदूषण हे केवळ वाहतुकीमुळे होते.

**- प्रदीप मोरे,** अंधेरी

मराठी साहित्यिक दिनविशेष

### तेवीस मार्च

**१८९७:-** कवी गुणवंत हणमंत देशपांडे यांचा जन्म. 'निवेदन (१९३५) हा त्यांचा एकमेव प्रकाशित काव्यसंग्रह, परंतु प्रासादिक व गूढगुंजन करणाऱ्या त्यांच्या काव्यशैलीने त्या काळावर ठसा उमटविला होता. **१९०६:-** कादंबऱ्या, लेख, बालसाहित्य विपूल प्रमाणात लिहिणाऱ्या कुमुदिनी रांगणेकर यांचा जन्म. 'अजब नायिका', 'अजब बदला', 'एकेरी गाठ' मिळून दोनएकशे कादंबऱ्या. 'बच्चू लछमन', 'फोडिला काळा फत्तर' ही नाटके इत्यादी. **१९०८:-** वृत्तपत्रलेखक, ब्राण मासिकाचे संपादक, रामकृष्ण नारायण केळकर यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'आमची धालो', 'आमच्या देवांच्या मुर्ती','पारसे व मोरज देवस्थानचा इतिहास ह्या ग्रंथाशिवाय काही वृत्तपत्रांचे संपादन त्यांनी केले. **१९१७:-** वर्तमानपत्रे तसेच मुंबई आकाशवाणीच्या वनिता मंडळासाठी विपुल लेखन करणाऱ्या लेखिका शरयू वासुदेव रानडे यांचा जन्म. 'शाल्मली' हा काव्यसंग्रह आणि 'साद देती हिमशिखरे' हे हिमालयातील प्रवासवर्णन त्यांचे प्रसिध्द. **१९२१:-** धर्मांतरित हिंदूना स्वधर्मात परत आणण्याचे काम करताना 'हिंदू मिशनरी सोसायटी' नावाचे साप्ताहिक काढणारे गजानन भास्कर वैद्य यांचे निधन. धर्मविषयक नऊ पुस्तकेही त्यांनी लिहिली. त्यामध्ये 'रेखात्मक यथार्थ दर्शन', 'चित्रविद्या', 'प्रश्नोपनिषद','हितोपदेश कथा', 'विक्रमोर्वशियम', 'सनातन धर्मविचार', 'देहदान मिमांसा', 'उपनयन विधी', 'वैदिक विवाह विधी' अशी ग्रंथ संपदा. **१९२४:-** शेकडोहून अधिक मराठी हिंदी चित्रपटांचे लेखक, नाटककार मधुसूदन कालेलकर यांचा जन्म. 'अपराध मीच केला', 'अमृतवेल', 'चांदणे शिंपीत जा', 'डार्लिंग डार्लिंग', 'दिवा जळू दे सारी', 'ही श्रींची इच्छा', 'हे फूल चंदनाचे' मिळून २५हून अधिक नाटके प्रकाशित झाली आहेत. **१९२७:-** इसापनीतीतील गोष्टी आर्या वृात आणणाऱ्या कवयित्री सरस्वतीबाई विद्याधर भिडे यांचे निधन. 'सरोजिनी' ही बंगाली कादंबरी त्यांनी (१९०९) मराठीत आणली. याशिवाय त्यांनी इसापनीतीतील गोष्टी आर्यवृत्तात रचल्या. 'अभिनय काव्यमाला भाग ५' या कवयित्रींच्या काव्यसंग्रहाचे संपादन त्यांनीच केले. सुप्रसिध्द मराठी कवि विद्याभर भिडे यांच्या त्या पत्नी. **१९३५:-** लेखिका मृणालिनी त्र्यंबक ढवळे यांचा जन्म. यांच्या साहित्य संपदेत 'अंतराळ झेप' ही युरी गार्गारिनवरील कादंबरी तसेच दृष्टीआड सृष्टी हे शास्त्रज्ञांवरील मुलांसाठी गोष्टीरुप पुस्तक आणि 'लोकमान्यांच्या सुनबाई' या चरित्रातून शांताबाई श्रीधर टिळक यांची माहिती अशी साहित्य संपदा. **१९५३:-** लेखक, कवी, पत्रकार प्रकाश विठ्ठल खंडागळे यांचा जन्म. ह्यांच्या प्रकाशित साहित्यात सामाजिक जाणीवेतून कवितासंग्रह 'आत्मगंधाच्या पाऊलखुणा', 'कुष्ठरोगी महिलेची कथा 'सत्कार' ही लघुकादंबरी आणि जयपूर कृत्रिम पाय बनविण्यासाठी पश्चिम आफ्रिका खंडातील 'लायबेरिया' देशातील अनुभवावर 'सफर लायबेरिया' हे प्रवासवर्णनात्मक अशी साहित्य संपदा. **१९५९:-** कथा-कादंबरीकार म्हणून नावाजलेले ते कृ ष्णाजी महादेव चिपळूणकर यांचे निधन. बी.ए.एल्.एल्.बी झालेल्या चिपळूणकरांनी पुण्यात वकिली केली. काही काळ ज्ञानकोश प्रकल्पात काम केले. 'व्रतपालन' ही एका इंग्रजी कादंबरीवर आधारलेली आणि 'निर्मला', 'दोष कुणाचा?' या दोन स्वतंत्र अशा एकूण तीन सामाजिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. याशिवाय चार्ल्स डिक्सनच्या 'अ टेल ऑफ टू सिटीज' चे रुपांतर, 'पापाचे प्रायश्चित' तसेच 'नेपोलियन' चे रुपांतर, 'शिवाजीचा पुतळा' या त्यांच्या कादंबऱ्या गाजल्या. तसेच 'उदयभानूचे बक्षीस' यासारख्या कथांनी वाचकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. **१९६०:-** महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री त्र्यंबक पाठक यांचे निधन. व्यासंगी संस्कृतपंडीत, व्याकरण, वेदान्त, धर्मशास्त्र इत्यादीचे गाढे अभ्यासक असणाऱ्या शास्त्रींजीनी संस्कृतमधून ईश, केन, कढ, मुण्डक या उपनिषदांवर 'बालबोधिनी टीका', 'महाभाष्य शब्दकोश' तसेच मराठीतून शुल्क यजुर्वेदाचे भाषांतर, नित्यविधी, अस्पृश्यतानिवारणाचा शास्त्रार्थ ही पुस्तके याशिवाय अनेक भाषांतर निबंध त्यांची प्रसिध्द झाली. **१९६४:-** कवी केवलराम लव्हाजी देशपांडे यांचा जन्म. 'जगताना' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९६८:-** भाषाभ्यासक आणि संस्कृतचे व्यासंगी भाषांतरकार यशवंत गणेश फफे यांचे निधन. शालेय व्युत्पत्तिदीपिका आणि 'शुद्धालेखनशिक्षण' ही त्यांची स्वतंत्र पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. याखेरीज चिपळूणकर आणि मंडळी यांनी प्रकाशित केलेला 'श्रीमन्महाभारत' ह्या ग्रंथाचे मराठी सुरस भाषांतर : पुस्तक चौथे : भीष्मपर्व व द्रोणपर्व हा ग्रंथ तयार करण्याच्या कामी त्यांनी 'म. ह. मोडक' यांना मोलाचे सहकार्य केले. **१९७४:-** लेखिका डॉ. रेखा रामकृष्ण जगनाळे यांचा जन्म. 'जनी म्हणे', 'बहेणी म्हणे', 'संतांनी पाहिलेला विठ्ठल' ह्या लेखमाला त्यांनी वृत्तपत्रातून लिहिल्या. याशिवाय 'प्रादेशिक ग्रामीण साहित्य-समीक्षेची समीक्षा. **२००७:-** प्रदेशनिष्ठ वाङ्:मयाचा दीपस्तंभ ठरलेले कादंबरीकार श्रीपाद नारायण पेंडसे यांचे निधन. 'एल्गार', 'लव्हाळी', 'गारंबीचा बापू', 'रथचक्र' अशा ११ कादंबऱ्या, पाच कादंबऱ्यांवर आधारित नाटके, शिवाय 'संभूसांच्या चाळीत', 'पंडित आता तरी शहाणे व्हा' आदी सात स्वतंत्र नाटके, असा या साहित्य अकादमी, जनस्थान पुरस्कारमंडित लेखकाचा आवाका होता. २०१५:- ज्येष्ठ नाट्यकर्मी, नाट्यकलाकार, एकांकिकाकार, लेखक जयंत बेंद्रे यांचे निधन.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# होळीनिमित्त बाजारपेठ सजली

**अलिबाग :** होळी, धुलिवंदन अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने रेवदंडा येथील बाजारात विविध आकारातील पिचकाऱ्या, विविध रंग दाखल झाले आहेत. खरेदीसाठी नागरिकांची रेलचेल दिसून येत आहे. बाजारात विविध आकारातील पिचकाऱ्या बच्चेकंपनीला आकर्षित करुन घेत असून, खरेदीसाठी झुंबड पहावयास मिळत आहे. ५० रुपयांपासून १००० रुपयांपर्यंत विविध आकारातील पिचकाऱ्यांना ग्राहकांकडून मोठी मागणी असल्याचे यावेळी व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले. तसेच नैसर्गिक रंगांना जास्त मागणी असल्याचे चित्र सध्या बाजारात दिसून येत आहे. रंगीबेरंगी टीशर्ट्सही बाजारात विक्रीसाठी दाखल झाल्याचे पहावयास मिळत असून, ग्राहकांकडून खरेदीस पसंती दर्शविण्यात येत आहे. सध्या छोटा भीम, तसेच अन्य कार्टून्सच्या पिचकाऱ्यांना मोठी मागणी असल्याचे व्यापाऱ्याकडून सांगण्यात आले.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः-

**मौजे- कानसळ, ता.सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. संजय जयराम मोरे | ११७ | ०-४९-९० | ७-४७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हीतसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- २२/०३/२०२४

खरेदी घेणार
श्री. चंदन कुंडाजी ठाकूर.
रा. साईराज बिल्डींग, प्लॉट नं. १६, रोड नं.१०,
सेक्टर-१,न्यु पनवेल,पनवेल,रायगड.४१०२०६

खरेदीदारांचे लेखक,
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड
स्टॅम्प व्हेंडर,रा.६९९ जमना निवास, पाली ता. सुधागड,
जि. रायगड. मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन राजेश्री ज्ञानेश्वर पाटील रा. ०६६३/०००३ मेन रोड मच्छी मार्केट जवळ घनसोळी गाव नवी मुंबई घनसोळी स. वो. ठाणे महाराष्ट्र ४००७०१. यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून २१ (एकवीस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| गुरुनाथ बाळाराम म्हात्रे | ७५ | १५ | ०-१२-० | ० | ११ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :-मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
दिनांक : २३/०३/२०२४
मो. नं. ९१५८२७७७२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे भातगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| चंद्रकांत श्रीधर पेंडूरकर | ४ | २ | ०-८९-६० | ७ | ८८ |
| लीना शांताराम पेंडूरकर | ४ | ३ | ०-२०-५० | ० | ५६ |
| | ४० | ३ | ०-२७-६० | ० | ८४ |
| | ४० | ४ | ०-३१-४० | ० | ९७ |
| | ४० | ५ | ०-११-४० | ० | ३५ |
| | ४० | ६ | ०-३१-४० | ० | ९४ |
| | ४० | ७ | ०-३०-८० | ० | ९८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही /-

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२,तळमजला,
साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ,
नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

नितीन अर्जुन क्षिरसागर
(ॲडव्होकेट)
दिनांक :-२३/०३/२०२४
मो. नं. ९३७२९६४६६५

## जाहीर नोटीस

दि. २३/०३/२०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-पाचखडकवाडी, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| बेबी रघुनाथ पिंगळे<br>अस्मिता संकेत वारे<br>राहुल रघुनाथ पिंगळे<br>अर्चना तुषार लांडगे | १० | ६/अ | ३.१६.००<br>या पैकी दिलेले क्षेत्र<br>०.४०.०० | २.३७ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. २३/०३/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. उत्कर्षा सुरेश सोनावळे**
पत्ता. श्रीसाई सावली अपार्टमेंट, दुसरा मजला,
दिवाणी न्यायालया समोर, कोतवाल नगर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.९०७५९९५९२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, आमचे अशिलांनी श्री. कृष्णा भाऊ बोडके, श्री. जगन्नाथ भाऊ बोडके, श्री. भरत भाऊ बोडके, श्री. सुरेश भाऊ बोडके, सर्व रा. हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून त्यांचे मालकीची मौजे हेदवली, तालुका कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीनीची मिळकत कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे हेदवली, तालुका कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन :**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| २०/५ | २-६८-००<br>पैकी ०-८०-०० | ५=९५ |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली शेतजमीनीची मिळकत तीमधील दगडमाती, झाडझाडोरा, पाणी जाण्यायेण्याचे मार्ग व हक्क, वहिवाटीचे व इजमेंटचे मार्ग व हक्क वगैरे तद्‌गभूत सर्व वस्तू, हक्क, हितसंबंध यासुद्धा.

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, कबजा, लिज, कुळवहिवाट बोजा, ताबा, इजमेंट, साठेकरार, लिएन अगर अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी पुराव्यासह तसे लेखी कळवावे. सदर मुदतीत आमचेकडे कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल फरोक्ताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर मागाहून उपस्थित केलेली कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २२/०३/२०२३.

सही/-
**श्री. प्रसन्न चंद्रकांत शिंदे**
बी.ए.एलएल.बी.ॲडव्होकेट
७५, अभिराज, मु. भिसेगांव,
पो. गुंडगे ता. कर्जत, जि. रायगड.
फोन क्रमांक ०२१४८-२२२१७१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेल्या मिळकतीचे मालक सारीका सागर कुलकर्णी रा. बिल्डींग नं ए/८, प्लॉट नं. ३०२ भुमीराज वुडर्स को. ऑप. सोसायटी. फ्लॉट नं ५५, सेक्टर २०, खारघर, ता. पनवेल. जि. रायगड.

यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांना कायम विकत देण्याचे ठरविले आहे. तसा ठराव केलेला आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन व उपविभाग नं २५५ क्षेत्र. ००-२१-०० हे.आर, आकार ३.०७ रु.पै.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे, असे समजून त्यासंबधी कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबध नाहीत असे गृहित धरून सदर व्यवहार पुर्ण केला जाईल व मुदतीतनंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही यांची नोद घ्यावी.

ता. २२/३/२०२४

**ॲड. गणेश कृष्णा पाटील**
शिवम सोसायटी, शॉप नं. ३, तळ मजला,
ब्राह्मण आळी, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, **मौजे-वारदोली, भेरले, भिंगारवाडी, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड** येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल श्री. सुदिप्ता गांगुली आणि सौ. मैत्रेयी गांगुली खरेदीखताने मालकीहक्काने कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

**वरीलप्रमाणे परीशिष्ट**

**मौजे-वारदोली, भेरले, भिंगारवाडी, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत**

| मिळकत मालक आणि विकासकाचे नाव | मिळकतीचे वर्णन |
|---|---|
| १. मेरसस वाधवा कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमी<br>पत्ता - ३०१, प्लॅटिना, सी-५९<br>बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा ईस्ट, मुंबई ४०००९८<br>२. मेरसस व्हॅल्युएबल प्रापर्टीज प्रायव्हेट लिमी<br>पत्ता -१५८, दाणी कार्पोरेट पार्क, सीएसटी रोड, कलीना, सांताक्रुझ ईस्ट, मुंबई ४०००९८ | भुखंड नं.१६८, 'द हेवन', आरझेड १ क्लस्टर, वाधवा वाईस सिटी टाउनशिप प्रोजेक्ट, मौजे - वारदोली, भेरले, भिंगारवाडी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड |

सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशीष्टातील वर्णन केलेल्या मिळकती मधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विकसन करार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, वाहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारे हरकत, तक्रार दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत, तक्रार दावा, हितसंबंध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार दावा वैगरे न आल्यास वरील परिशीष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशीष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यांनतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक :- २२/०३/२०२४

**श्री. किशोर धाकड**
**ॲडव्होकेट**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,
ज्याअर्थी मौजे - तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून, आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे-तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री. रमाकांत शंकर देशमुख<br>श्री. दिलीप शंकर देशमुख | २२/७/अ | ०.१९.०० | ०.१९ |

**वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुध्दा.**

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. रमाकांत शंकर देशमुख व इतर १ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन मालकी हक्काचे प्रमाणपत्र व ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक: २२/०३/२०२४

सही /-
**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता- शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, मौजे धामोते ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं./ प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १) कविता सिन्हा | ११२/८ | २१२.७५ चौ.मी. | २१.३०२ |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिध्द झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. राहूल अनंता कदम**
रा.वाकस, पो.वाकस ता.कर्जत जि.रायगड
फोन नं. ७७६९०४४९९९

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे बोर्ली, ता. मुरुड, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक जोसेफ वालेर परेरा रा. कोलई, ता. मुरुड, जि.रायगड यांच्या नांवे असलेली खालील मिळकत माझे स्नेही श्री. योगेश अरविंद दांडेकर, रा. सुयोग को. ऑप. हौ. सोसा. श्रीबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| बोर्ली | ५९ | - | ०-१९-०० | |
| ता. मुरुड | | पो.ख. | ०-०१-९० | २.७५ |
| | | एकूण | ०-२०-९० | |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०३/२०२४

सही /-
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा. थेरोंडा (धाकलीवाडी), पो.चौल ता.अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विदयमान मालकांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींच्या मालकीहक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकी हक्क आहेत व त्या विकणेचा त्यासं पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार,हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

**मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार रू.पैसे | मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ३०३ | ०-४७-६०<br>पो.ख.०-०३-००<br>०-५०-६० | ४.७९ | वर्षा मनोहर पाटील<br>कोमल मनोहर पाटील |
| ३१० | ०-५२-१०<br>पो.ख.०-०६-८०<br>०-५८-९० | १०.६९ | वर्षा मनोहर पाटील व<br>कोमल मनोहर पाटील |
| ३११ | ०-०५-००<br>पो.ख.०-०१-००<br>०-०६-०० | ०.१९ | लिलेश किसन म्हात्रे |
| ३१२ | ०-२८-०० | ०.५२ | वर्षा मनोहर पाटील व<br>कोमल मनोहर पाटील |
| ३१३ | ०-१७-०० | ०.३७ | वर्षा मनोहर पाटील व<br>कोमल मनोहर पाटील |
| ३१५ | ०-२७-०० | ०.५२ | वर्षा मनोहर पाटील व<br>कोमल मनोहर पाटील |
| ३१८/२ | ०-१७-०० | ०.३६ | वर्षा मनोहर पाटील व<br>कोमल मनोहर पाटील |
| ३१९ | ०-२६-०० | ०.५२ | वर्षा मनोहर पाटील व<br>कोमल मनोहर पाटील |

अलिबाग
तारीख :२३/३/२०२४

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील.
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२`२०१.

ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड

दि. २२-०३-२०२४

## जाहीर नोटीस

जा.क्र.२८८/२०२४

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकनकर्त्यांचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २ | ७९०/१ | जेथे स्मती सह गृह संस्था चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला४३६ चौ.फुट | सुरेखा सुर्यकांत पाटील | स्वप्निल अनिल गोरे, अनिल परशुराम गोरे |
| २ | ४ | १६८०/८ | ज्वेल्स ऑफ अलिबाग अलिबाग एच विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ८३०चौ.फुट | विष्णू वामनराव हिवरे | शत्रुघ्न कृष्णा कडवे, दर्शना शत्रुघ्न कडवे |
| ३ | २ | १२१२ | विठ्ठलमंदिर रस्ता | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम रो हाऊस ८००चौ.फुट | श्रीमती रश्मी रमेश दहिगावकर | सुरेखा गणेश बिर्जे, गणेश जिगन्नाथ बर्जे |
| ४ | २ | १८०३/१ | श्री महालक्ष्मी सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५६७ चौ.फुट | श्री. रतिलाल देवजीभाई पटेल | सारिका समीर घरत, समीर वसंत घरत |
| ५ | ६ | | विष्णू लक्ष्मी विहास | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ७३५ चौ.फुट | आशा अशोक कणेकर | संतोष सुधाकर थळकर |
| ६ | ४ | १४७३/५ | गौरीनंदन को.ऑप.हौ. सोसा. सी विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ९०६ चौ.फुट | भुषण विश्वनाथ डोंगरे | मयुरी संजय दळवी |
| ७ | ५ | ८९९/२० | तुलसी गृह.संस्था मर्या. चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ८०५चौ.फुट. | सुहासिनी सदाशिव भालेकर | सुनिता नरेश पाटील |
| ८ | ४ | १९८४/२१ | वैभव को.ऑप.हौ. सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला ८०५ चौ.फुट | पद्मजा डेव्हलपर्स प्रोप्रा.तर्फे श्री. उदय पांडुरंग शेठ | प्रशांत भास्कर धनावडे शुभांगी प्रशांत धनावडे |
| ९ | ३ | १०२७/१ | मधुबन सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ४६० चौ.फुट | सौ. स्मिता श्रीकांत वारंजीकर | सुनिल चंद्रय्या वडलुरी, भक्ती सुनिल वडलुरी |
| १० | ४ | १५२४/५ | ज्वेल्स ऑफ अलिबाग सोसा एल विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ४६० चौ.फुट | श्री. वैभव राजन नागे | रोहित दिलीप बोरसे, श्रुती रोहित बोरसे |
| ११ | २ | ११०३/१,२ | विद्यानगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळ +१ मजला चौ. फुट | प्रविण चंद्रकांत वाघ, रोहिणी प्रविण वाघ | प्रविण चंद्रकांत वाघ |
| १२ | ५ | १२५८/२ | जेजुरी सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ५५० चौ. फुट | अमोल लक्ष्मण मदने | अजित सदाशिव सुळे शिल्पा नामदेव सोलकर |
| १३ | २ | १२४५/१८ | हेरंब सोसायटी बी विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५४० चौ. फुट | साक्षी सिद्धेश देवरुखकर | श्री. सिद्धेश विवेक देवरुखकर |
| १४ | २ | १६४०/१६ | जय गजानन सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ५७५चौ.फुट | श्रीमती स्मिता सतिश पाटील पर्वणी सतिश पाटील राहुल सतिश पाटील रश्मी सतिश पाटील | राजेश गजानन नाईक, रचना राजेश नाईक |
| १५ | ५ | ९४२/१३ | कृष्णदर्शन अे विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ५८० चौ.फुट | सचिन शिवाजी कट्टा | दिपक जानू पवार |
| १६ | २ | १०८१/४ | सिद्धांत सोसायटी, चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळ मजला ५९५ चौ.फुट | गिता गणेश पाटील | विपुल विजय राणे |
| १७ | ३ | २९०/२३ | कोहिनुर सोसा, | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका | जगदीश पांडुरंग पाटील | जयश्री जगदीश पाटील |
| १८ | ३ | २९०/२४ | कोहिनुर सोसा, | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला २६४.५० चौ.फुट | श्रीमती पार्वती जगन्नाथ पाटील | अभिषेक रमेश म्हात्रे, आकाश रमेश म्हात्रे, अक्षय रमेश म्हात्रे |
| १९ | २ | ११२९/१३ | साईसुधा अपार्ट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ६२५चौ.फुट | जयमेश नारायण म्हात्रे | चंद्रासिंग गोत्रा |
| २० | १ | ११२४/६ | भास्कर रेसिडेन्सी सि विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ६३० चौ.फुट | मालती मधुसुदन घरत | स्वाती योगेश वर्तक |
| २१ | ३ | १७७४/३ | रिया रिचा कॉम्प्लेक्स | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ८५० चौ.फुट | श्री. सुजित शांताराम घरत | श्री. प्रितेश प्रभाकर चव्हाण, आराध्या प्रितेश चव्हाण, श्रीमती प्रिती प्रभाकर चव्हाण |
| २२ | ५ | | कृष्णदर्शन सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला चौ.फुट | तुषार दयानंद म्हात्रे | तेजल तुषार म्हात्रे व इतर |
| २३ | २ | १२६४ | शिवाजीनगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ. फुट | मंजुळा नरदास घरत | मंजुळा नरदास घरत नरदास मोतीराम घरत |
| २४ | १ | १२२/५ | उष:काल सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ७९१.१४ चौ.फुट | महादेव गोविंद मानकर | यतिश प्रदीप मानकर लवेश प्रमोद मानकर |

सही/-
**श्री. निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता. अलिबाग,जि.रायगड**

## निवडक

### शिव मंदिराचे जीर्णोद्धार

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील पोटल गावातील प्राचीन शिव मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा २१, २२ मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता. मंदिराच्या जीर्णोद्धारनिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे निमित्ताने मंदिराचा संकल्प पूर्ण झाले असून या वास्तूचे उभारणी केली श्री व सौ धारा हरीश डेडिया यांच्या पुढाकार घतला होता. ग्रामस्थ मंडळ पाली यांच्या वतीने हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी पूजा होमहवन, गणेश पूजन, वास्तू शांती आदी कार्यक्रम करण्यात आले.

### शहीददिनाचे आयोजन

**आगरदांडा :** मुरुड जुनी पेठ येथील मोहन करंदेकर यांच्या निवासस्थानी शनिवारी (दि.२३) शहीददिनाचे आयोजन करण्यात आले आहे. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, राजगुरू व सुखदेवफासावर गेले होते. यांच्या वीर मरणाला शहीददिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने करंदेकर गेली ४२ वर्षे शहीददिन निवासस्थानी साजरा करतात. यावेळी येणाऱ्यांना भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या वीरांची आठवणी सांगत असतात. शहीददिनानिमित्त वीरांना आदरांजली वाहण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

### वळके केंद्रात जनजागृती

**मुरूड जंजिरा :** गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृतीसाठी प्रभात फेरी काढण्यात आली. वळके केंद्रातील चोरढे मराठी शाळा, चोरडे उर्दू, तळेखार, सावरोली, वेताळवाडी, शिवगाव, ताडगाव ताडवाडी, सातिर्डे, वळके, शिरगाव आमली, संजय नगर चेहेर, वाघुळवाडी शाळांनी अभियान राबवले. अभियान यशस्वी होण्यासाठी रमेश भंगर, राजेंद्र नाईक, संगीता भगत, राजाराम म्हात्रे, रुईकर, जगदीश चवरकर, देवानंद गोगर, हेमंत म्हात्रे, कल्याणी शिंदे, रेश्मा गुंड आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### उसर्लीत तरुण बेपत्ता

**पनवेल :** उसर्ली येथे राहणार १९ वर्षीय तरुण कामावर जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडलेला तरुण अद्याप घरी न परतल्याने तो हवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. चरणदास रामसिंग पवार असे या तरुणाचे नाव असून त्याचा रंग गोरा, उंची अंदाजे ५.५ फुट, केस काळे, नाक-सरळ, चेहरा-उभट, डोळे-काळ्या रंगाचे, अंगानी-सडपातळ आहे. तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### गावंड यांची निवड

**उरण :** स्टेट इनोव्हेशन रिसर्च फाउंडेशन महाराष्ट्र तर्फे आयोजित राष्ट्रीय स्तर शैक्षणिक नवोपक्रम स्पर्धा २०२३ चा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला.यात नवीन शेवे, तालुका उरण येथील उपक्रमशील शिक्षिका शर्मिला गावंड यांच्या नवोपक्रमाची निवड झाली आहे.त्यांना नॅशनल इनोव्हेटिव्ह अवॉर्ड ने सन्मानित करण्यात येणार आहे. गावंड यांच्या व्हिडिओच्या माध्यमातून अध्ययन अध्यापनास प्रेरणा या उपक्रमाची निवड करण्यात आली.

# आयपीएलचा दिमाखदार शुभारंभ

## उद्घाटनादरम्यान ‘नया भारत’ची झलक




**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

**चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियममध्ये शुक्रवारी (दि. २२) आयपीएलच्या २०२४ च्या उद्घाटन सोहळा रंगारंग कार्यक्रमांनी शुभारंभ करण्यात आला. चाहते, बॉलिवूड कलाकार या सोहळ्याला उपस्थित आहेत. बॉलीवूड अभिनेते अक्षय कुमार तसेच टायगर श्रॉफ यांनी उद्घाटन सोहळ्याला सुरुवात केली. तर ए आर रहमान तसेच सोनू निगम आपल्या गायनाने चाहत्याची मने जिंकली. याशिवाय आणखी काही परफॉर्मन्सही पाहायला मिळाले. उद्घाटन सोहळ्यात चांद्रयान मोहीमेचे ॲनिमेशन देखील दाखवण्यात आलं. त्याचबरोबर गाण्यांच्या कार्यक्रमात देशभक्तीपर गाणी गाण्यात आली.**

आयपीएलच्या १७ व्या हंगामातील सलामीच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आमनेसामने आले. या सामन्याचे आयोजन चेन्नईतील एमए चिदंबरम स्टेडियममध्ये करण्यात आले.

चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधारपद ऋतुराज गायकवाड याच्याकडे आहे. तर फाफ डु प्लेसीस हा आरसीबीचा कर्णधार आहे. नाणेफेकीचा कौल आरसीबीच्या बाजूने लागला. आरसीबीचा कर्णधार फाफ डु प्लेसीस याने बॅटिंगचा निर्णय घेतला.

चेन्नई सुपर किंग्संच्या संघामध्ये एकूण चार परदेशी खेळाडू आहेत. यामध्ये मूळ भारतीय वंशाचा रचीन रवींद्र, डॅरेल मिचेल आणि इतर दोघांचा समावेश आहे. तसेच दुखापतीमुळे सीएसकेचा ओपनर डेव्हॉन कॉनव्हे याला सलामीच्या सामन्यातून मुकावं लागलं आहे.

चेन्नई सुपर किंग्ज प्लेइंग इलेव्हन : ऋतुराज गायकवाड (कर्णधार), रचीन रवींद्र, अजिंक्य रहाणे, डॅरिल मिचेल, रवींद्र जडेजा, समीर रिझवी, एमएस धोनी (विकेटकीपर), दीपक चहर, महेश तीक्षना, मुस्तफिजुर रहमान आणि तुषार देशपांडे.

रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू प्लेइंग इलेव्हन : फाफ डू प्लेसिस (कर्णधार), विराट कोहली, रजत पाटीदार, ग्लेन मॅक्सवेल, कॅमेरुन ग्रीन, दिनेश कार्तिक (विकेटकीपर), अनुज रावत, कर्ण शर्मा, अल्झारी जोसेफ, मयंक डागर आणि मोहम्मद सिराज.



# क्षात्रैक्य माळी समाजातर्फे क्रिकेट लीगचे आयोजन

**। अलिबाग । वार्ताहर ।**

रायगडमध्ये अलिबागच्या लहान लहान गावांत तसेच राज्यभर विखुरलेला क्षात्रैक्य माळी समाज एकत्र येऊन समाजातील मुलांचे क्रिकेटमधील कला गुण कौशल्य दिसावे. या हेतूने या चषकाचे आयोजन शुक्रवारी (दि.२२) कुरुळ आझाद मैदान येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये १६ संघांनी सहभाग घेतला असून लीग स्वरूपामध्ये ह्या स्पर्धा खेळवल्या जाणार आहेत.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुप्रिया पाटील, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, सावता माळी बँक चेअरमन रमेश नाईक, विजय कवळे, शंकर गुरव, श्रीकांत कवळे, भूपेंद्र पाटील, जयंत नाईक, जगदीश कवळे, मनोज राऊळ, श्रीनाथ कवळे, विजय म्हात्रे, सदिच्छा पाटील, अवधूत पाटील, निलेश नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्वदेस मित्रांचा गुणगौरव उत्साहात

**। माणगाव । वार्ताहर ।**



रॉनीस्क्रूवालावझरीनास्क्रूवाला यांच्या स्वदेस फाऊंडेशनच्या वतीने माणगाव, तळा, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन आणि सुधागड येथील स्वदेस फाऊंडेशनतर्फे गाव पातळीवर आरोग्याचे स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्या स्वदेस मित्रांचा गुण गौरव सोहळा नुकताच माणगाव येथील गांधी मेमोरियल हॉल येथे करण्यात आला. यासाठी मॅनकाइंड फार्मा कंपनीने सहकार्य केले.

आरोग्यउपक्रमामध्ये अतुलनीय आणि सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या ४२ स्वदेस मित्रांचा पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. स्वदेस फाउंडेशनच्या संस्थापक झरीना स्क्रूवाला यांनी दूरदृश्य प्रणाली द्वारे मार्गदर्शन करून पुरस्कार प्राप्त स्वदेस मित्रांचे कौतुक केले. यावेळी स्वदेस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे, अखिलेश डीमरी, माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गोमसाळे व शंकरा आय हॉस्पिटलचे डॉ. राजेश कापसे, तालुका आरोग्य अधिकारी महाड डॉ. नितीन बावडेकर, तालुका आरोग्य अधिकारी तळा डॉ.वंदन कुमार पाटील, तालुका आरोग्य अधिकारी म्हसळा डॉ. प्रशांत गायकवाड,तालुका आरोग्य अधिकारी सुधागड डॉ. शशिकांत मढवी, डॉ. दिपाली पुरी उपस्थित होते.

# कायरा घरतला ‘ब्लू बेल्ट’

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



अलिबागमधील कायरा घरतने कराटे स्पर्धेत ब्लू बेल्ट मिळविला. चौल शितलादेवी येथील कायरा अक्षय चेंढरे येथील सेंटमेरी कॉन्व्हेंट स्कूलमधील विद्यार्थीनी असून इयत्ता दुसरीमध्ये ती शिकत आहे. वयाच्या पाच वर्षापासून ती कराटेचे धडे घेत आहे. तसेच प्रशिक्षक राहूल तावडे यांच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शनामुळे कराटे स्पर्धेतून कायरा हीने तीन वर्षात आठहून अधिक बक्षीसे मिळविली आहेत. नुकतीच अलिबागमध्ये जपान शितोकाई कराटे स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत वेगवेगळ्या शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये कायरा घरत हिने उत्तम कामगिरी करीत ब्लू बेल्ट पटकाविला. भविष्यात ब्लॅक बेल्ट मिळविण्याचे तिचे स्वप्न असून त्यासाठी अथक परिश्रम घेणार असल्याचे तिने सांगितले. तिच्या या कामगिरीबद्दल सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



पनवेलच्या भाजी मार्केटमध्ये होळी आणि रंग पंचमी करीता पिचकारी, रंग खरेदी करताना नागरिक.

(छायाचित्र : राजेश डांगळे)

# उष्म्याने श्रीवर्धनकर त्रस्त

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

मागील दोन दिवसांपासून वातावरणात अचानक बदल झालेला पाहायला मिळत आहे. वातावरण काहीसे ढगाळ होत असल्यामुळे उष्म्याचे प्रमाण अचानक वाढण्यास सुरुवात झाली आहे. मार्च महिना सुरू झाला तरी चांगल्या प्रमाणात थंडी पडत होती. दिवसा थोडे गरम झाले तरी रात्री मात्र चांगल्या प्रकारे गारवा असल्याचे जाणवायचे. वातावरण ढगाळ होत असल्यामुळे हवामानातील सापेक्ष आर्द्रता वाढल्याने नागरिकांना घाम येण्याचे प्रकार देखील जाणवत आहेत.

शुक्रवारी (दि.२२) दुपारच्या वेळेला जवळ जवळ ३४ अंश सेल्सिअस तापमानात वाढ झाली होती. साधारण होळी सण जवळ आला की वातावरणातील उष्णता वाढायला सुरुवात होते. यावर्षी देखील होळीला दोन दिवस बाकी असताना हवेतील उष्म्याचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे नागरिकांना उष्म्याचा त्रास सहन करावा लागत आहे. उष्म्याचे प्रमाण वाढल्यामुळे थंड पदार्थांच्या व थंड पेयांच्या विक्रीमध्ये वाढ होताना दिसत आहे.

# तळ्यात अग्निशमन वाहनाची मागणी

**। तळा । वार्ताहर ।**



तळा नगरपंचायतीमध्ये अग्निशमन वाहनाची आवश्यकता भासू लागली आहे. तालुक्यात विविध ठिकाणी घडणाऱ्या आगीच्या घटना तसेच ठिकठिकाणी लागणारे वनवे यामुळे वनसंपदा नष्ट होत चालली असून तळा नगरपंचायतीचया ताफ्यात अग्निशमन दलाचे वाहन असेल तर अशा घटना रोखण्यास किंबहुना कमी नुकसान होण्यास मदत होईल. गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याचे तसेच जंगल भागात वनवे लागण्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. काही वेळा आगीचे प्रमाण वाढल्यास आग आटोक्यात आणण्यासाठी रोहा व माणगाव येथून अग्निशमन दलाच्या वाहनाला पाचारण करावे लागते. अशावेळी अंतर लांब असल्याने अग्निशमन दलाचे वाहन येईपर्यंत मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असते. मात्र नगरपंचायतीचया ताफ्यात अग्निशमन दलाचे वाहन आल्यास दुर्घटनेच्या ठिकाणी तात्काळ पोहचता येणार असून जास्त होणारे नुकसानही रोखता येणार आहे. त्यामुळे तळा नगरपंचायतीच्या ताफ्यात अग्निशमन दलाच्या जवानांसह अग्निशमन वाहन उपलब्ध व्हावे अशी मागणी तळावासीयांकडून केली जात आहे.

# निलेश मसणेला एमपीएससी परीक्षेत यश

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यातील आंबोट गावातील निलेश मसणे याने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षेची तयारी केली. त्याने आंबोट गावातील राजिप शाळेत झाले तर बारावीपर्यंत गौळवाडी येथील माध्यमिक विद्यालयात झाले. त्यानंतर कर्जत येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयात कला शाखेत पदवी मिळविली. २०२० मध्ये कला शाखेची पदवी घेतल्यानंतर एमपीएससी परीक्षा देण्याचा निर्धार केला आणि त्याची तयारी सुरु केली. राज्य लोकसेवा आयोग २०२३ परीक्षेचा निकाल जाहीर झाला त्यात निलेशला एमपीएससी परीक्षेत यशस्वी होऊन पोलीस अधिकारी होण्याचा मान मिळविला.

# ‘स्वदेस फाऊंडेशनतर्फे शिष्यवृत्तीची योजना’

**। म्हसळा । वार्ताहर ।**

रॉनीस्क्रूवाला व झरीनास्क्रूवाला यांच्या स्वदेस फाउंडेशनच्या वतीने रायगड जिल्ह्यामधील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर व सुधागड या तालुक्यामध्ये ग्रामीण सक्षमीकरणाचे प्रकल्प गाव विकास समितीच्या सहकार्यांमधून राबवित आहेत. स्वदेस शिष्यवृत्ती योजना हा या उपक्रमाचाच एक भाग आहे. गेल्या अनेक शैक्षणिक वर्षांमध्ये स्वदेस फाउंडेशनच्या मदतीने ५५४ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देऊन त्यांची उच्च शिक्षणाची स्वप्नपूर्ण करण्यासाठी मदत केली आहे.

स्वदेस फाऊंडेशनतर्फे आवाहन करण्यात येते की, जे गरीब आणि होतकरू विद्यार्थी आहेत त्यांनी या शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी महाड आर्यन मेहता- ९११३११०३२६, पोलादपूर साईप्रतीक पानिग्रही ८३२७७१३२९६, म्हसळा श्रीवर्धन राकेश पवार ८६६८६३७७१३, तळा, सुधागड शबनम बुशरा ८४३९४११४५२, माणगाव दीप्ती खैरे ९१४५९२३४०१, तालुका प्रतिनिधी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केला आहे.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **इंग्लीश बोलण्यांतील अडथळे,** भिती खात्रीने घालवणार सोपा कोर्स. नंबर जपून ठेवा, गरज लागेल. ९८२२८४२८१०
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. १.रेस्टॉरंट मनेजर २.वेटर ३.साऊथ इंडियन नाश्ता बनवणारा कूक ४.अकाउंटंट २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५.
- **साईश्रद्धा फाऊंडेशनच्या अलिबाग येथील ऑफिससाठी ॲबॅकस** शिकवण्यासाठी शिक्षक पाहिजे तसेच अकाऊंटंट कम क्लार्क पाहिजे. तसेच म्युच्युअल फंड व शेअर मार्केटसाठी सेल्स पर्सन पाहिजेत. आपला बायोडाटा ८३९०९०९४७० किंवा ८१६९६०४५७५ वर वॉटसअप करा.
- **इलेक्ट्रिकल (वायरींग) कामासाठी गरजू (हेल्पर) मुले हवी आहेत.** चेंढरे-गोंधळपाडा ९२७०६१४०७७
- **फ्लॅटस विकणे आहेत.** अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही असे दोन 2BHK फ्लॅट्स त्वरीत विकणे आहेत. किंमत- ७३ लाख आणि ८३ लाख. संपर्क : ८६९८६८२१२१ (एजंट क्षमस्व)
- **घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई** हवी पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८ ते ६ संपर्क - ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- **अलिबागमध्ये सलून कामासाठी** अनुभवी मुलगा पाहिजे. मो. ९९२१०७३९६३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# विज्ञान युगातही होळीचे महत्त्व

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**



पुरातन काळापासून होळी सणाचे महत्व असून विज्ञान आणि अत्याधुनिक काळात देखील तेवढ्याच श्रद्धेने आणि परंपरेने होलिकोसत्व साजरा केला जातोय असे आपण पाहत आलो आहोत. कारण याला पौराणिक आणि वैज्ञानिक महत्व आहे. संपूर्ण भारतात रंगाचा हा आनंददायी सण साजरा करताना दिसतात.

होळी सणाला पौराणीक कारण आहे. पुरातन काळात राजा हिरण्यकश्यपू हा स्वतःला देव समजू लागला होता.त्याचा मुलगा प्रल्हाद हा विष्णुभक्त होता, ही गोष्ट हिरण्यकश्यपू ला आजिबात आवडत नसल्याने त्याने प्रल्हाद याला परावृत्त करण्याचा सातत्याने प्रयत्न केला.ऐकत नसल्याने हिरण्यकश्यपूने प्रल्हादाला जाळून मारण्यासाठी बहीण होलिकाची मदत घेतली. होलिकाला अग्नीत न जळण्याचे वरदान प्राप्त होते. हिरण्यकश्यपू राजाच्या सांगण्यावरून होलिकाने प्रल्हादाला आपल्या मांडीवर बसवून अग्नीत प्रवेश केला.प्रत्यक्षात भगवान विष्णूच्या कृपेने भक्त प्रल्हादाला काहीही न होता वाचला, आणि वाईट हेतूने आलेली होलिका वरदान असूनही आगीत भस्मसात झाली. तात्पर्य वाईटावर चांगल्याप्रवृत्तीचा विजय होतो. या घटनेच्या प्रित्यर्थ फाल्गुनी पौर्णिमेला होळी दहन केले जाते. दुसऱ्या दिवशी रंगाची धुळवड साजरी केली जाते.हा रंगाचा सण असल्याने सर्वच जण याची आतुरतेने वाट पाहत असतात. होळी साठी लाकडे, गोवऱ्या आणून गावागावांतून सुपारी किंवा भेंडीचे, एरंडाचे झाड आणून होळी रचली जाते. होळीला विधिवत पुरण पोळीचा नैवेद्य दाखवून पूजा करतात.जे अमंगल वाईट आहे, कालबाह्य आहे त्याचा नाश करून नव्या चांगल्या गोष्टींचा स्वीकार करायचा हाच होळीचा खरा संदेश आहे.

होळी सणाला वैज्ञानिक कारण देखील आहे. या सणापासून वसंत ऋतूचा प्रारंभ होतो. हिवाळा समाप्त होऊन उन्हाळ्याची चाहूल लागण्याचा हा काळ असल्याने निसर्गचक्र दाहकतेकडे जाण्याचा हा काळ असतो.थंडीच्या दिवसात आपले शरीर सुस्त झालेले असते.या मुळे शारीरिक थकवा आल्या सारखे जाणवते.वसंत ऋतूत उष्णता वाढण्यास सुरुवात होते. होळी दहना मुळे निर्माण झालेला अग्नी माणसाच्या शरीराला ऊर्जा मिळण्यास मदत करून ताजेतवाने करतो. निसर्गातील हा बदल मानवाने स्वीकारावा या साठी होळी साजरी केली जाते. अशी वैज्ञानिक कारणे त्यामागे आहेत.



# उरण तालुक्यात उकाडा वाढला

**। उरण । वार्ताहर ।**

वातावरणातील बदलांमुळे उरण तालुक्यातील तापमानाचा पारा ३० अंशांच्या पुढेच रेंगाळला असल्याने दुपारी रस्त्यावरून फिरताना उन्हाचे चटके आणि उकाडा वाढला आहे. रात्रीचा गारवाही काही ठिकाणी हरवला आहे. गुरुवारी ( दि२१) ही सलग दुसऱ्या दिवशी तापमानात वाढ होऊन दिवसभरात कमाल ३०.९ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली असल्याची माहिती प्राप्त होत आहे.

वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि डोंगर परिसरातील उत्खनन, दगड खाणींत होणारे स्फोट तसेच वातावरणातील बदलामुळे तालुक्यातील तापमानाचा पारा चढत आहे. त्यामुळे दुपारी रस्त्यावर मार्गक्रमण करणाऱ्या प्रवाशी नागरीकांना उन्हाचे चटके सहन करावे लागत आहेत. मार्च महिन्यातील वाढत्या उष्णतेवर मात करण्यासाठी शितपेयांचा आसरा घेताना दिसत आहेत.

# झाली का तयारी?



छोट्या दोस्तांनो, परीक्षा आता अगदी तोंडावर आली असेल ना? दहावी बारावीचे पेपर संपल्याबरोबर लगेच तुमची परीक्षा सुरू होईल. परीक्षेची मानसिक आणि अभ्यासिक तयारी झाली असेलच. थोडी उजळणी करत असताना 'आता कधी एकदा परीक्षा संपते!' अशी भावना तुमच्या मनात आल्यावाचून राहणार नाही. पण या मनोरंजनात महत्त्वाच्या गोष्टी विसरू नका. सुट्टीचे वेध इतके मोहक असतात की अभ्यासही विसरायला होतो. पण मुलांनो, तसं होऊ देऊ नका. परीक्षेशी निगडीत सर्व बाबींकडे व्यवस्थित लक्ष द्या. अभ्यास तर तुम्ही करताच पण त्यासोबतच परीक्षेसाठी आवश्यक असणारं साहित्य सोबत घेणं विसरू नका. परीक्षेला जाताना तुमच्याकडे सर्व सामग्री असणं गरजेचं आहे. कंपॉसबॉक्समध्ये सर्व साहित्य जमा करून ठेवणं हीदेखील एक महत्त्वाची पूर्वतयारी आहे. या साहित्यामध्ये पेन, पेन्सिलसारख्या नेहमीच्या वस्तूंसोबतच जादाची सामग्रीसुद्धा ठेवा. उदाहरणार्थ, लीड पेन्सिल वापरत असाल तर लीड बॉक्स सोबत ठेवा. भूमितीचा पेपर असेल तर भौमितिक आकृत्यांसाठी लागणारं साहित्य सोबत ठेवा. या साहित्याचा सेट बाजारात मिळतो. तो संपूर्ण सेटच भूमितीच्या पेपरला कामी येतो. त्यामुळे हा सेट सोबत ठेवा. तसंच जादा पेनसोबतच एखादी रिफीलही सोबत ठेवा. शाई गळणार नाही अशी पेन्स सोबत ठेवा. परीक्षेला नवीन पेन वापरणं टाळा. तुम्ही रोज वापरत असलेल्या पेनाची तुम्हाला सवय झालेली असते. तुमचं हस्ताक्षर त्या पेनामुळे व्यवस्थित उमटत असतं. त्यामुळे तुम्ही नेहमी वापरत असलेल्या पेनामध्ये रिफील घालून परीक्षेला वापरा. एखाद्या पेपरमध्ये पुरवणी वापरावी लागली तर तुमच्यासोबत स्टेपलर असू द्या. शाळेत पुरवणी जोडायला दोरा पुरवतात पण अनेकदा दोऱ्याने बांधणं जमत नाही. अशा वेळी स्टेपलर कामी येते. अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते. त्यामुळे अशा गोष्टींची एक यादी करा. परीक्षेला जायच्या आधी या यादीमधील सर्व बाबींची काळजी घेतली आहे ना याची खात्री करा आणि निर्धास्तपणे परीक्षेला जा!

**पूर्वतयारी**

# जड झाले ओझे?

शाळेत, क्लासला किंवा अगदी फिरायला जाताना आपण जड बॅकपॅक पाठीवर घेतो. बरीच मुलं दप्तर म्हणून अशा बॅकपॅकचा वापर करतात. भरपूर कप्पे असलेल्या बॅकपॅक वापरायला सुटसुटीत वाटतात. पण, ही बॅकपॅक नीट घेतली नाही तर पाठीची दुखणी मागे लागू शकतात. आपल्या पाठीचा कणा ३३ हाडांनी बनलेला असतो. त्यांना मणका असं म्हटलं जातं. या मणक्यांच्या मध्ये चकत्या असतात. या चकत्यांमुळे मणक्यांचं रक्षण होतं. जड बॅकपॅक चुकीच्या पद्धतीने खांद्यांवर घेतली तर वजनामुळे तुम्ही मागच्या बाजूला झुकता. तोल सांभाळण्यासाठी तुम्ही पुढच्या बाजूला वाकण्याचा प्रयत्न करता किंवा पाठ वाकवता. यामुळे



मणक्यांवर ताण येतो. जड दप्तरं चुकीच्या पद्धतीने घेतल्याने अनेकांचे खांदे गोल होतात किंवा पाठीला बाक येतो. वजनामुळे पाठ, मान किंवा खांदे दुखू लागतात. दप्तर किंवा बॅकपॅक एका खांद्यावर घेतली तर वजनामुळे तुम्ही एका बाजूला झुकता. यामुळे पाठीच्या खालच्या किंवा वरच्या भागाचं दुखणं मागे लागू शकतं. खांदे आणि मानेवर ताण येऊ शकतो. बॅकपॅकच्या पट्ट्यांमुळे खांद्याजवळच्या नसा दाबल्या जाण्याची शक्यता असते. याचा परिणाम रक्ताभिसरणावर होतो. यामुळे हातातल्या संवेदना जाऊ शकतात. त्यामुळे जास्त जड दप्तर घेऊ नका. बॅकपॅक दोन्ही खांद्यांवर घ्या. यामुळे वजनाची विभागणी होईल. तसंच जड दप्तर उचलताना गुडघ्यांमध्ये वाका. आणि हो, मित्रांनो व्यायाम करून पाठ आणि मानेचे स्नायू बळकट करा.

**हेल्थ इज वेल्थ**



# निसर्गाची चतुराई

तुम्हा मुलामुलींना फळं खूप आवडतात. मे महिन्यात भरपूर आंबे खाऊन झाले असतील. तुम्ही कलिंगड आणि इतर फळंही खाल्ली असतील. झाडाला फळं का लागत असतील, असा प्रश्न तुम्हाला कधी पडला आहे का? प्राणीमात्रांना गोड फळं चाखता यावीत या उद्देशाने झाडाला फळं लागत असतील का? याचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल. कारण झाडं खूप हुशार असतात. माणसं, पक्षी आणि प्राण्यांचा वापर करून झाडं आपल्या बिया विविध ठिकाणी विखुरल्या जातील असं बघतात. आईच्या पोटात जसं बाळ वाढतं त्याचप्रमाणे फळाच्या पोटात झाडाचं बाळ म्हणजे बीज असतं. फळ बियांची आईप्रमाणे काळजी घेत असतं. बीचा विकास होत असताना फळातल्या गराच्या माध्यमातून त्याचं रक्षण होत असतं. बी रूजण्यासाठी तयार होईपर्यंत फळ आंबट लागतं. आंबट फळं आपण खात नाही. न पिकलेली फळं गोड लागली असती तर काय झालं असतं याचा विचार करा. फळाच्या बिया अपरिपक्व राहिल्या असत्या. म्हणजे बियांचा पूर्ण विकास झाला नसता. फळ खाल्ल्यानंतर बिया फेकून दिल्या असत्या तरी त्यातून नवं रोपटं रूजू शकलं नसतं. त्यामुळे निसर्गाने फळाला पिकल्यावरच गोडवा दिला. या काळात फळाच्या आतल्या बियासुद्धा रूजायला आणि नवनिर्मिती करायला सज्ज होतात. पिकलेली, गोड, रसाळ फळं आपण खातो. पक्षीही ही फळं खातात. मग या बिया आपण टाकून देतो. त्या जमिनीत रूजतात आणि नवं रोपटं रूजतं. अशी ही निसर्गाची प्रक्रिया आहे.

**गम्मत ग्यान**

# माशीच्या आकाराचा ड्रोन

विविध कारणांसाठी ड्रोनचा वापर केला जातो. आज जगात वेगवेगळ्या आकाराचे ड्रोन्स उपलब्ध आहेत. शास्त्रज्ञांनी माशीच्या आकाराइतका वायरलेस ड्रोन तयार केला आहे. या ड्रोनच्या मदतीने छोट्यातल्या छोट्या ठिकाणी लक्ष ठेवणं सोपं जाणार आहे. या ड्रोनच्या संशोधन चमूमध्ये तीन भारतीयांचा समावेश आहे. ऐलिन स्कूल्स नेटवर्क, मोबाईल सिस्टिम लॅब्स आणि मॅकेनिकल इंजिनियर्सच्या मदतीने हा ड्रोन ऑटोनॉमस इन्सॅक्ट रोबोटिक लॅबमध्ये तयार करण्यात आला आहे.



रोबोटिक्समधला हा महत्त्वाचा शोध मानला जात आहे. 'रोबोफ्लाय' असं या वायरलेस ड्रोनचं नाव आहे. यात अगदी छोट्या आकाराचे पंख बसवण्यात आले आहेत. या ड्रोनला ऊर्जा पुरवण्यासाठी वायरची गरज पडणार नाही. अशा प्रकारचा हा पहिलाच ड्रोन आहे. यात मायक्रोप्रोसेसर बसवण्यात आला आहे. तसंच टूथपिकपेक्षा छोट्या आकाराच्या अल्ट्रा लाईट सर्किटचा वापर करून हा ड्रोन तयार करण्यात आला आहे. हा ड्रोन शेतांमधल्या पिकांवर लक्ष ठेवू शकतो तसंच वायूगळतीसारख्या घटनांमध्ये मदत करू शकतो, असं संशोधकांचं म्हणणं आहे.

**स्मार्ट टेक**

# हॅण्डप्रिंट मॉन्स्टर

छोट्यांनो, तुम्हाला मॉन्स्टर आवडतात का? घरच्या घरी तुम्ही हाताच्या आकाराचे मॉन्स्टर बनवू शकता.


**साहित्य :** लाल, केशरी, जांभळा, पांढरा आणि हिरव्या रंगाचा कार्डस्टॉक, वेगवेगळ्या आकाराचे गुगली आईज, पॉम पॉम, ब्लॅक शार्पी, गम

**कृती :** सर्वात आधी कार्डस्टॉक अर्धा दुमडून घ्या. आता दुमडलेल्या कार्डस्टॉकवर हाताचा पंजा ठेऊन आकार काढून घ्या. हाताचा आकार कापून घ्या. हाताचा आकार कापून घेताना बोटांचा वरचा भाग गोलाकार असेल असं बघा. आता पाचही बोटांवर गुगली आईज चिकटवून घ्या. काही कार्डस्टॉकच्या बोटांवर गुगली आईज चिकटवा तर काहीच्या पंज्याच्या भागावर ते चिकटवून घ्या. तुम्हाला हव्या असलेल्या ठिकाणी मॉन्स्टरचे डोळे चिकटवा. आता तुम्ही मॉन्स्टरना तोंड काढू शकता. पॉमपॉमच्या मदतीने इतर सजावट करू शकता. मॉन्स्टर बनवण्यासाठी कल्पकता लढवा. छानसे मॉन्स्टर तयार करा.




**करून तर पहा**

चारच्या पटीत अंक जोडून (४, ८, १२ या क्रमाने) हे चित्र पूर्ण करा पाहू...



# आयफोनमध्ये डाटा ट्रान्सफर करताना...

घरातल्यांपैकी एखाद्याने आयफोन घेतल्यावर अँड्रॉइड फोनमधला डाटा त्यात ट्रान्सफर करावा लागतो. एका ऑपरेटिंग सिस्टिममधून दुसऱ्या सिस्टिममध्ये डाटा ट्रान्सफर करण्याचं काम थोडं कठिण असतं. यासाठी बरीच धावपळ करावी लागते. दुकानदाराकडेही जावं लागतं. पण फाईल्स ट्रान्सफर करण्याची ही प्रक्रिया सोपी होऊ शकते. छोट्या मित्र-मैत्रिणींनो, तुम्हीही या कामी घरच्यांची मदत करू शकता. यासाठी काय करायला हवं याविषयी...



✼ पहिल्यांदा कॉंटॅक्ट लिस्ट अँड्रॉइड फोनची मेमरी किंवा मायक्रो एसडी कार्डमध्ये सीएसव्ही किंवा व्हिसीएस फॉरमॅटमध्ये सेव्ह करावी लागेल.

✼ यानंतर डाटा केबलचा वापर करून लॅपटॉप किंवा डेस्कटॉपवर फाईल ट्रान्सफर करता येईल.

✼ लॅपटॉप किंवा डेस्कटॉपवर ट्रान्सफर केलेल्या फाईलला आय क्लाउड किंवा गुगलमध्ये इंपोर्ट करता येईल. त्यानंतर ही फाईल आयफोनमध्ये एक्सपोर्ट करता येईल.

✼ गुगलद्वारे कॉंटॅक्ट सिंक्रोनाइज करून आयफोनमध्ये डाटा ट्रान्सफर करता येईल.

✼ कॉंटॅक्ट्स सिंक्रोनाइज करण्यासाठी अँड्रॉइड फोनमध्ये गुगल अकाउंटच्या माध्यमातून लॉग इन करा.

✼ यानंतर अँड्रॉइड फोनच्या सेटिंग्जमध्ये जाऊन युजर आणि अकाउंट किंवा अकाउंट आणि सिंक या पर्यायांवर क्लिक करा.

✼ आता 'सिंक डाटा'वर टॅप करा किंवा ऑटो सिंक ऑप्शन एनेबल करा.

✼ यानंतर तुमची कॉंटॅक्ट लिस्ट सिंक्रोनाइज होईल.

✼ आता आयफोन घ्या. सेटिंग्जमध्ये जाऊन अकाउंट्स आणि पासवर्ड ऑप्शनवर क्लिक करा.

✼ यानंतर तुम्हाला जीमेल अकाउंट जोडावं लागणार आहे. यावेळी अकाउंट सिंक्रोनाइजचा ऑप्शन एनेबल करून ठेवायला हवा.

या स्टेप्स फॉलो करून अँड्रॉइड फोनमधून डाटा आयफोनमध्ये ट्रान्सफर करायला कोणालाही मदत करू शकता.

**टेक वर्ल्ड**

**जिज्ञासा**

## ओळखा पाहू...

१) जगातला सर्वात मोठा महासागर कोणता?
२) बर्म्युडा ट्रँगल कोणत्या महासागरात आहे?
३) मध्यान्हीच्या सूर्याचा देश असं कोणाला म्हटलं जातं?
४) हजार तलावांचा देश असं कोणाला म्हटलं जातं?
५) पांढरे हत्ती कोणत्या देशात आढळतात?
६) सर्वाधिक देश कोणत्या खंडात आहेत?
७) कॉफीचं सर्वाधिक उत्पादन कोणत्या देशात होतं?
८) माउंट एटना हा जिवंत ज्वालामुखी कोणत्या देशात आहे?
९) कोणत्या देशाला लँड ऑफ ट्युलिप्स असं म्हटलं जातं?
१०) कोणत्या पर्वताला जगाचं छप्पर असं म्हटलं जातं?

उत्तरं: १) पॅसिफिक २) अटलांटिक ३) जपान ४) फिनलंड ५) थायलंड ६) आफ्रिका ७) ब्राझील ८) इटली ९) नेदरलँड १०) पामीर

# करीअरला द्या कलाटणी

बारावी तसंच पदवीनंतर विविध विषयांशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही उत्तम करीअर घडवू शकता. दहावी-बारावीत काही कारणांमुळे कमी गुण मिळाले तरी घाबरण्याचं काहीच कारण नाही. स्वत:मधल्या गुणांचा, कौशल्यांचा विकास करून तुम्ही यशस्वी होऊ शकता.




✼ कल्पकता हा गुण असलेले विद्यार्थी वेब डिझायनिंग किंवा ग्राफिक डिझायनिंगमधला डिप्लोमा पूर्ण करू शकतात.

✼ स्वयंपाकाची आवड असलेले विद्यार्थी हॉटेल मॅनेजमेंटचा अभ्यासक्रम करू शकतात. हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, हॉटेल मॅनेजमेंटमध्ये आज बऱ्याच संधी उपलब्ध आहेत.

✼ पर्यटनाचं क्षेत्र आज वेगाने विस्तारत आहे. ट्रॅव्हल अॅण्ड टूरिझम हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तुम्हाला बऱ्याच संधी मिळू शकतात. पर्यटनाची आवड, नेतृत्त्व कौशल्य, संवादकौशल्य असे गुण असतील तर तुम्ही पुढे जाऊ शकता. संवादकौशल्य असेल तर टेलीकम्युनिकेशनचा डिप्लोमा करता येईल.

✼ लग्न, पुरस्कार सोहळे यासारख्या इव्हेंट्सचं आयोजन करून तुम्ही करीअरची सुरूवात करू शकता. कल्पकता आणि नेतृत्त्वगुण इथे आवश्यक आहेत.

✼ सध्या सौंदर्यक्षेत्रात बऱ्याच संधी आहेत. तुम्ही सौंदर्याशी संबंधित विविध अभ्यासक्रम करू शकता.

**कोण होणार?**




# जाणून घ्या हवामानाविषयी

सध्या उन्हाळा आहे. पुढच्या काही दिवसात पाऊस सुरू होईल. हवामान, वातावरण सतत बदलत असतं. वेधशाळा हवामानातले बदल टिपत असते. हवामानाचा अंदाज वर्तवणं हे एक शास्त्र आहे. तुम्हालाही हवामानाबाबत जाणून घ्यायचं असेल तर www.webwhether.com या वेबसाईटला भेट द्या. या साईटवर तुम्हाला हवामानाबद्दलची सगळी माहिती मिळेल. इथे गमतीशीर गेम्सही आहेत. ढग कसे तयार होतात, चक्रीवादळ कसं येतं, वीजा चमकणं, ढगांचं गडगडणं म्हणजे काय याबद्दल सगळी माहिती तुम्हाला या साईटवर मिळेल. इतकंच नाही, तर इथे तुम्हीही हवामानाचा अंदाज वर्तवण्यासाठी प्रयत्न करू शकता. वैज्ञानिक प्रयोगांच्या माध्यमातूनही




हवामानाबाबतची माहिती जाणून घेता येणार आहे. धुकं कसं तयार होतं? ढग कसा तयार होतो हे सगळं तुम्ही प्रयोग करून समजून घेऊ शकता. हॉट एअर बलूनचा प्रयोगही इथे देण्यात आला आहे. इथे तापमान, हवेचा दाब, स्थिर आणि अस्थिर हवा, आर्द्रता आणि दवबिंदू यांसह विविध विषयांवरची माहिती तुम्हाला मिळू शकते. त्यामुळे सुट्टीत गंमत म्हणून या वेबसाईटला भेट द्या आणि पावसाचा अंदाज कसा वर्तवायचा हे जाणून घ्या!

**स्मार्ट गॅझेट**

**दोस्त हे मस्त**

## चायनीज जायंट सालामेंडर

हा जगातला सर्वात मोठा उभयचर प्राणी आहे. हा प्राणी दुर्मीळ प्रजातीमध्ये मोडतो. त्याचं वजन ६५ पाउंडांपर्यंत असू शकतं तर लांबी पाच फूट ९ इंचांपर्यंत असू शकते. हा प्राणी वेगवेगळा आवाज काढतो. द इन्फंट फिश या नावानेही तो ओळखला जातो.



**खादाडी**

## चुरमुरे स्नॅक



दुपारी खायला तुम्ही चुरमुऱ्यांची मस्त डिश बनवू शकता. यासाठी एक कप चुरमुरे, पाव कप चिरलेला कांदा, एक चमचा लिंबाचा रस, पाव कप डाळ, पाव कप दाणे, थोडं तिखट, मीठ आणि चिरलेली कोथिंबीर असं साहित्य घ्या. चुरमुरे आणि दाणे कढईत भाजून घ्या. थंड होऊ द्या. आता त्यात उरलेलं साहित्य घाला. सर्व मिश्रण नीट मिक्स करून घ्या. हवं तेव्हा खा!

**लाईफस्टाईल**

## रात्री जागता का?

तुम्ही रात्री जास्त वेळ जागता का? यामुळे तुमच्या आरोग्याला धोका पोहचू शकतो. सुट्यांमध्ये तुम्ही जागरण करता. पण हे चुकीचं आहे. रात्री उशिरापर्यंत




जागल्याने अनेक विकारांना निमंत्रण मिळतं. डोकेदुखीसारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे मुलांनो, रात्री लवकर झोपा आणि सकाळी लवकर उठा.

**योगा टाईम**

## सिंहासन

सिंहासनामुळे शरीराच्या खालच्या भागाला आराम मिळतो. इतकंच नाही, तर तुमचं मनही यामुळे शांत होईल. हे आसन करण्यासाठी गुडघ्यांवर बसा. हाताचे पंजे दोन्ही गुडघ्यांवर ठेवा. बोटांमध्ये अंतर ठेवा. थोडे पुढे वळा आणि तोंड उघडून जीभ बाहेर काढा. तोंडातून श्वास बाहेर घेताना गर्जना केल्यासारखं करा. अशा प्रकारे पाच वेळा करा.



# कलासक्त

**हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध संगीतदिग्दर्शक व पार्श्वगायक. मूळ नाव रामचंद्र नरहर चितळकर. 'सी. रामचंद्र' हे संक्षिप्त नाव त्यांनी सिनेदिग्दर्शक जयंत देसाई ह्यांच्या सूचनेवरून धारण केले. आपल्या निकटवर्तीयांत ते 'अण्णा' म्हणून प्रसिद्ध होते. आर. एन. चितळकर, श्यामू, राम चितळकर, सी. रामचंद्र व अण्णासाहेब अशा विविध नावांनी त्यांनी संगीतदिग्दर्शन व पार्श्वगायन केले. त्यांचा जन्म पुणतांब्याचा (जि. अहमदनगर ). पुणतांब्याजवळील चितळी हे त्यांच्या घराण्याचे मूळ गाव होते. नागपूरच्या 'श्रीराम संगीत विद्यालया'त त्यांनी संगीताचे पहिले धडे गिरविले आणि उत्तम गाणारा मुलगा असा लौकिक मिळविला.**

## सप्तसुरांचा अधिपती संगीतसुर्य सी. रामचंद्र

श्रीराम शेट्ये



ही कहाणी आहे एका महान संगीतकाराची ज्यांना सी. रामचंद्र म्हणून सारे जग ओळखते.

त्यांचे खरे नाव रामचंद्र नरहर चितळकर. त्याचा जन्म १२ जानेवारी १९१८ साली अहमदनगर जिल्ह्यातील चितळी या गावी झाला. चितळी हे पुनतांब्याच्या शेजारील गाव आहे. त्यांचे वडील नरहर चितळकर हे रेल्वेमध्ये नोकरी करीत होते.

त्यांच्या वडीलांची दोन लग्ने झाली होती. राम हा त्यांच्या दुसऱ्या पत्नीपासून झालेले अपत्य होते. रामचे पालनपोषण, वात्सल्य सर्व मोठ्या (सावत्र) आईनेच केले. रामच्या सख्ख्या आईने रामवर कधीच प्रेम केले नाही. राम महिन्याभराचा असेल आणि रामच्या वडिलांची बदली झाली. रामला डोंगरगड या वडिलांच्या नोकरीच्या गावी जावे लागले. हा डोंगरगड निसर्गसंपन्न होता. चोहोबाजूंनी हिरव्यागार डोंगरांनी वेढलेले हे गाव जणू निसर्गाच्या ओंजळीतच वसलेले होते. वनराईने बहरलेल्या तिथल्या वाऱ्याच्या स्वरात खचितच संगीताचा गोडवा होता. असंख्य निनावी पाखरांनी अगणित रागिणी त्या गावातील झाडावर बसून छेडल्या असतील. रामच्या मोठ्या (सावत्र) आईच्या वागण्यात, बोलण्यात संगीत ओसंडून वाहत असे. वडिलांनाही संगीताचा नाद होता. ते वेळीअवेळी नाट्यगीत घरातच मोठ्या आवाजात गात गात काम करीत असत. या सगळ्या वातावरणात रामच्या बालमनात संगीताची बीजे खोलवर रोवली जात होती.

वडिलांच्या नोकरीच्या निमित्ताने रामचे बालपण डोंगरगड, नागपूर, विलासपूर, गोंदिया इत्यादी गावांतून भटकत राहिले. बालपणाबरोबर थोडी समजही आली. डोक्यावर जंगली लाकडांचे भारे घेऊन सांजवेळी निघालेल्या गोडीणींची (आदिवासींची) गाणी रामच्या कानांना आवडू लागली. ती ऐकण्यासाठी राम खेळ सोडून स्तब्ध उभा राहू लागला.

रामचे वडील रामला कधी तमाशा बघायला न्यायचे तर कधी नाटक, सर्कस. यातूनच रामचा संगीत आणि अभिनय याकडचा ओढा वाढत चालला होता. शालेय शिक्षणात फारसा रस नव्हता. एक वेळ राम परीक्षेत नापास झाला होता. अवघे नऊ वर्षाचा असेल तेव्हा. रात्री वडील कामावरुन आल्यावर त्यांना ही वार्ता समजली. त्यांनी शिक्षा म्हणून रामला अंगावरचे सर्व कपडे उतरवायला लावले आणि दिगंबर अवस्थेत घरातून हाकलून दिले. राम वाट चुकलेल्या कुत्र्याच्या पोरासारखा दिशाहीन गतीने चालू लागला होता. कितीतरी वेळ चालत होता. राग ओसरल्यावर वडिलांना उपरती झाली. रात्री सायकल घेऊन परत ते रामला शोधायला गेले. त्याला परत घरी घेऊन आले.

रामच्या वडिलांनी रामला एकाचवेळी दोन शाळांत घातले होते. न्यु इंग्लिश स्कूलच्या इंग्रजी पहिल्या इयत्तेत आणि श्रीराम संगीत विद्यालयाच्या प्रारंभ वर्गात. संगीत विद्यालयाचे सप्रे मास्तर राम वर खुप खुष होते. ते म्हणायचे हा मुलगा तर एक दिवस नाव काढेल. सप्रे मास्तर अतिशय प्रेमळ, हसतमुख होते. शिकवता शिकवता ते वा: राम!,वा: राम !! म्हणत. ग्रामीण भागातील रंगमंचावर लोकांसमोर रामला उभे करण्याची एकही संधी ते सोडत नसत. गावातील 'संत सखू' या नाटकात रामला विठ्ठलाची भुमिका करण्यासाठी मास्तरांनी प्रोत्साहन दिले. नाटक आणि चित्रपट यांची रामला आवड होती. म्हणूनच नागपूरात शंकरराव सप्रे यांच्याकडे त्याने संगीत शिक्षण घेतले. पुढे गंधर्व विद्यालय पुणे येथे श्री. विनायक बूवा पटवर्धन यांच्याकडे संगीत अध्ययन केले.

उपजत गोड गळा, चौकसपणा, तीव्र ग्रहणशक्ती आणि उपजत कष्टाळू वृत्ती यामुळे तो यशाच्या जवळ जाऊ लागला. दरम्यान नागपूर शहरात असताना त्याला देशी विदेशी मुके चित्रपट (मुकपट) पहायचे व्यसन लागले. एकदा तर पैसे नव्हते म्हणून एका पानवाल्याचे पैसे चोरून त्याने चित्रपट पाहिला.

एक वेळ अशी आली की रामला एका श्रीमंत माणसाला दत्तक देण्याचा निर्णय रामच्या वडिलांनी घेतला. तो माणूस गडगंज श्रीमंत होता राम आयुष्यभर सुखात राहील हीच वडिलांची भावना होती.

परंतु हे ऐकून व्याकूळ झालेल्या रामची अवस्था बघून वडील गहिवरले त्यांनी माघार घेतली. नंतर वडिलांनी रामला

गिरणीत नोकरी करण्यासाठी त्याचा मोठा भाऊ नाना याच्याकडे सोलापूरला पाठवले. राम दिवसभर घरात बसून रहात असे. रामला चित्रपटात काम करायची ईच्छा आहे हे



त्याच्या मोठ्या भावाला माहिती होते. कोल्हापुरात 'ललित पिक्चर' नावाची एक संस्था होती. त्यांना अभिनय करण्यासाठी तरूण हवेत अशी जाहिरात वर्तमानपत्रात आली होती.

मोठ्या भावाने रामचे काही निवडक फोटो अर्जाला जोडून अर्ज पाठवून दिला. रामची निवड झाली. संगीताच्या वेडानेच त्यांने पुण्यातल्या सिनेटोनमध्ये संगीत विभागात प्रवेश मिळविला. तेथे तो हार्मोनियम वाजवत असे. प्रभात फिल्म कंपनीचे कोल्हापुरात स्थलांतर झाल्यावर त्या स्टुडिओत सम्राट फिल्म कंपनीतर्फे हिंदी व मराठी भाषेत 'नागानंद'(१९३५) नावाचा चित्रपट तयार केला. यात गाणारा तरुण अभिनेता हवा होता. यासाठी सी. रामचंद्र यांची निवड झाली. 'नागानंद' चे संगीतकार वामराव सडोलीकर होते. त्यांच्याकडून प्रशस्तीपत्र घेऊन सी. रामचंद्र मिनर्व्हा मुव्हीटोनचे प्रसिद्ध निर्माता दिग्दर्शक सोहराब मोदी यांना भेटले. तिथले संगीतकार ग्यानदत्त, बी. एस. हुगल व मीरसाहेब यांच्याकडून त्यांनी महत्वाच्या बऱ्याच गोष्टी शिकून घेतल्या. सोहराब मोदी यांनी त्यांना संगीताबरोबरच गायनाचाही सल्ला दिला. 'लाल हवेली' या १९४४ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटात त्यांनी याकूब या अभिनेत्यासाठी पार्श्वगायन केले. याच काळात त्यांची मास्टर भगवान यांच्याशी ओळख झाली. त्यांनी 'वनमोहिनी' व 'जयकोंडी' या दोन तमिळ चित्रपटांसाठी सी. रामचंद्र यांना करारबद्ध केले.

नंतर मा. भगवान यांच्याच 'सुखी जीवन' या हिंदी चित्रपटला संगीत देऊन सी. रामचंद्र यांनी नवा अध्याय सुरू केला. तमिळ चित्रपटांसाठी संगीत देत असताना जयंत देसाई यांनी त्यांना सी. रामचंद्र हे नाव धारण करण्यास भाग पाडले. नंतर फिल्मीस्तान कंपनीत त्यांनी सफर (१९४६), शहंनाई (१९४७), साजन (१९४७), समाधी (१९५०), अनारकली (१९५३) यासारख्या अनेक अजरामर चित्रपटांना संगीत दिले. सी. रामचंद्र यांनी पाश्चिमात्य संगीत आणि वाद्य यांचा भारतीय संगीताशी बेमालूम मेळ घातला. आणि संगीताच्या एका नव्या पर्वाला जन्म दिला. ज्यामुळे संगीत विश्वात एक नविनच क्रांती उदयास आली. त्यांच्या संगीताच्या सप्तसुरांनी अवघे आसमंत व्यापून टाकले.

त्यांनी लता मंगेशकर यांच्यासोबत गायलेली आणि संगीतबद्ध केलेली सन १९५१ मध्ये आलेल्या अलबेला मधील 'शाम तले खिडकी खुले तूम सिटी बजाना छोड दो' आणि 'भोली सुरत दिल के खोटे' या गाण्यांनी लोकप्रियतेचे सगळे मापदंड पार केले. प्रेक्षक बेभान होऊन थिएटर मध्ये नाचू लागले. 'नींदिया धिरे से आजा रे अखियन मे' ही हिंदी लोरी (अंगाई गीत) लहान मुलांसाठी बाळकडू आहे. तर 'नवरंग' चित्रपटातील मदहोश करणारे 'आधा है चंद्रमा रात आधी' हे गाणे. यांसारखी अनेक गाणी लग्नाच्या वराती, दांडीया व इतर कार्यक्रमात या गाण्यांची लोकप्रियता आजही कायम आहे. सन १९५५ साली लता मंगेशकर यांच्यासोबत त्यांनी गायलेली 'कितना हसीं है मौसम' हे आझाद चित्रपटतील युगलगीत अप्रतिम आहे.१९४७ साली प्रदर्शित झालेल्या 'चूल आणि मूल' या मराठी चित्रपटासाठी सी. रामचंद्र यांनी संगीत दिग्दर्शन केले होते. त्यांनीच मराठी चित्रपटांना आपल्या ठेवणीतल्या चाली दिल्या. आपले सहाय्यक दत्ता डावजेकर यांना त्यांनीच प्रथम गाणी ध्वनिमुद्रित करण्याची संधी दिली. १९५२ साली भालजी पेंढारकर यांच्या आग्रहाखातर त्यांनी 'छत्रपती शिवाजी' या चित्रपटाला संगीतबद्ध केले. त्यांनी हिंदी आणि मराठी चित्रपटांत अभिनय, दिग्दर्शन, निर्माता, गायन, संगीत या सर्वच क्षेत्रात काम केले.

पण एक संगीतकार म्हणून ते अजरामर झाले.

पाकिस्तानी आणि चिनी लष्कराने भारतावर जेव्हा हल्ला केला. त्या वेळेस 'ऐ मेरे वतन के लोगो' हे लता मंगेशकर यांच्या आवाजातील गाणे गाजत होते.

हे गाणे ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या डोळ्यात पाणी आले होते. कवी प्रदिप यांनी लिहिलेले हे देशभक्तीपर गीत सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ■

## अल्ट्रा झकासच्या मनोरंजन विश्वात 'रेडीमिक्स' आणि 'जय स्वच्छमेव जयते बोला' चित्रपट समाविष्ट!



संपूर्ण महाराष्ट्रात 'रेडीमिक्स' आणि 'जय स्वच्छमेव जयते बोला' या चित्रपटांनी जोरदार धुमाकूळ घालून रसिक प्रेक्षकांच्या मनात घर केलं होतं. दोन्ही चित्रपट आता पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीस येण्यासाठी सज्ज झाले आहेत. 'रेडीमिक्स' हा 'अल्ट्रा झकास' या मराठी ओटीटीवर उपलब्ध झाला असून 'जय स्वच्छमेव जयते बोला' १८ मार्च २०२४ रोजी ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे.

आपल्या मोठ्या बहिणीला प्रेमात मिळालेल्या धोक्याच्या निराशेतून बाहेर काढण्यासाठी नूपुरने आखलेली योजना यशस्वी होईल का, हे रेडीमिक्स चित्रपटात तर गोगलगावातील लोकांना घाणीतून स्वच्छ आणि सुंदर गाव करण्यासाठी अनासपूरेंची योजना यशस्वी होईल का, हे जय स्वच्छमेव जयते बोला या चित्रपटात बघता येणार आहे.

'रेडीमिक्स' चित्रपटात वैभव तत्ववादी, प्रार्थना बेहेरे आणि नेहा जोशी यांचा जबरदस्त अभिनय पहायला मिळणार असून मकरंद अनासपूरे यांनी 'जय स्वच्छमेव जयते बोला' चित्रपटात आपल्या विनोदी ढंगाने समाजासाठी एक गंभीर संदेश दिला आहे.

'समाजात मनोरंजन महत्वाचं आहे, त्याचबरोबर समाजाचं प्रबोधनही तेवढंच महत्वाचं आहे. मनोरंजातून प्रबोधन करणारे रेडीमिक्स आणि जय स्वच्छमेव जयते बोला हे चित्रपट प्रेक्षकांना बहाल करताना मनात एक उत्स्फूर्त भावना आहे' असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री.सुशीकुमार अग्रवाल म्हणाले. ■



## ऑस्करचा झगमगाट, मिस वर्ल्डचा लखलखाट

**ऑस्कर पुरस्कार वितरण सोहळ्याच्या झगमगाटात न्हाऊन निघालेले जगभरातले खासमखास चित्रपट आणि मिस वर्ल्ड स्पर्धेचा दिमाख या आठवड्यात जगभरातील कलारसिकांचे डोळे दीपवून गेला. दोन्ही सोहळ्यांनी खास उंची गाठलीच, पण ओपनहायमर आणि मिस वर्ल्ड क्रिस्तिना झेकियाने कर्तबगारीचे नवे मापदंड प्रस्थापित केले. या दोन नेत्रदीपक घडामोडींचा हा खास मागोवा.**

राधिका परांजपे



मनोरंजनाचे विश्व व्यापक झाले आणि आकर्षकता वाढत गेल्याने प्रवाहात आग्रहाने समाविष्टही झाले. त्यालाही आता एक काळ उलटून गेला आहे. अलिकडच्या काळातील त्याची व्यापकता तर प्रत्येक व्यापार-व्यवहारावर प्रभाव टाकणारी आहे. त्यामुळेच या क्षेत्रातील प्रत्येक घटनेची दखल घेतली जाते. त्यामध्ये अंमळ स्थान मिळवणारे चेहरे पुढचा बराच काळ चर्चेत राहतात. कलेशी संबंधित विविध गुणांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणारे हे चेहरे अनेकांपुढे आदर्श निर्माण करतात तर अनेकांना प्रेरणाही देऊन जातात. या पार्श्वभूमीवर या क्षेत्रात पार पडलेल्या अलिकडच्या दोन मोठ्या घटनांकडे पाहणे गरजेचे ठरते.

अलिकडेच मिस वर्ल्ड २०२४ स्पर्धेचा 'ग्रँड फिनाले' भारतात आयोजित मोठ्या दिमाखात संपन्न झाला. केवळ शारीरिक सौंदर्यच नव्हे तर वैचारिक आणि भावनिक पातळीवरही सहभागी सदस्यांचा कस बघणारी ही स्पर्धा मनोरंजनविश्वात एक महत्त्वाचे स्थान राखून आहे. जगभरातील फॅशन इंडस्ट्रीमध्ये नवनवीन ट्रेंड निर्माण करण्याची क्षमता असणाऱ्या या स्पर्धेतील आपल्या देशातील सौंदर्यवतीचा सहभाग देशवासियांच्या औत्सुक्याचा विषय असतो. त्यामुळेच मुंबईतील जियो वर्ल्ड कन्वेंशन सेंटरमध्ये पार पडलेल्या मिस वर्ल्ड २०२४ स्पर्धेच्या अंतिम फेरीकडे भारताचे खास लक्ष होते. सालाबादाप्रमाणे या सोहळ्यामध्ये अनेक सेलिब्रिटींनी परफॉर्म केले. या स्पर्धेत ११५ देशांमधील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. शेवटपर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या या स्पर्धेमध्ये चेक रिपब्लिकच्या क्रिस्टीना पिजकोव्हा हिने विजेतेपद पटकावले तर लेबनॉनची यास्मिना जायतौन पहिली उपविजेती ठरली. विजेत्या स्पर्धकांचे नाव घोषित केल्यानंतर गेल्या वर्षीची विजेती कॅरोलिना बिएलॉस्का हिने विजेती आणि उपविजेतीच्या डोक्यावर मानाचा मुकुट घातला. साहजिकच सध्या समस्त जगात क्रिस्टीना पिजकोव्हाची चर्चा आहे. जगातील सर्वात सुंदर स्त्री ठरलेल्या २५ वर्षीय क्रिस्टीना पिजकोव्हाबद्दल अधिक माहिती घेण्यास जग उत्सुक आहे.

क्रिस्टीना पिजकोव्हाचा जन्म १९ जानेवारी १९९९ रोजी चेक रिपब्लिकमध्ये झाला. या देशाची राजधानी प्राग येथील चार्ल्स युनिव्हर्सिटीमधून ती कायद्याची पदवी घेत आहे. याशिवाय मॅनेजमेंटचा कोर्सही करत आहे. क्रिस्टीना पिजकोव्हा अनेक क्षेत्रांमध्ये कार्यरत असून प्रगतीच्या शिखरावर आहे, असेही म्हणता येईल. शिक्षणासोबतच ती आपली प्रत्येक आवडदेखील जाणीवपूर्वक जपत आहे. 'मिस वर्ल्ड'चा किताब नावावर केल्यामुळे सध्या तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. क्रिस्टीनाला सामाजिक कार्याची आवड आहे. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी ती एक फाउंडेशन चालवत असून त्याद्वारे अनेक उपयुक्त उपक्रम राबवते. गरजूंसाठी शैक्षणिक कार्यक्रम राबावण्यास तसेच मनोरुग्णांना मदत होईल, असे काम करण्यास तिचे प्राधान्य असते.

**'बार्बी' या चित्रपटातील 'वॉट वॉज आय मेड फॉर' हे यंदाचे सर्वोत्कृष्ट गाणे ठरले. दुसरीकडे, डावाइन जॉय रैंडोल्फला 'द होल्डओवर्स'मधील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. ही जंत्री बरीच मोठी आहे. इतरही अनेक श्रेणींमध्ये अनेक कलाकारांना ऑस्कर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यावर ओझरती नजर टाकायची झाल्यास सर्वोत्कृष्ट साउंडसाठी 'द जोन ऑफ इंटरेस्ट', सर्वोत्कृष्ट लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्मसाठी 'द वंडरफुल स्टोरी ऑफ हेनरी शुगर', सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंट्री फीचर फिल्म पुरस्कारासाठी '२० डेज इन मारियुपोल', सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंट्री शॉर्ट फिल्म म्हणून 'द लास्ट रिपेयर शॉप', सर्वोत्कृष्ट फिल्म एडिटिंगच्या पुरस्कारासाठी 'ओपेनहाइमर', सर्वोत्कृष्ट व्हिज्युअल इफेक्ट्ससाठी 'गॉडजिला माइनस वन, सर्वोत्कृष्ट इंटरनॅशनल फिचर फिल्म म्हणून 'द जोन ऑफ इंटरेस्ट', सर्वोत्कृष्ट वेशभूषासाठी 'पुअर थिंग्ज' तर सर्वोत्कृष्ट प्रॉडक्शन डिझाइनसाठीही 'पुअर थिंग्ज'ला सन्मानित करण्यात आले.**

यंदाच्या मिस वर्ल्ड २०२४ स्पर्धेत भारताच्या सिनी शेट्टीनेदेखील चांगली कामगिरी केली. साहजिकच तिला भारतीय चाहत्यांकडून प्रचंड पाठिंबा मिळाला. मुंबईत शिकलेल्या सिनीने आपल्या जन्मस्थानी म्हणजेच मुंबईत मिस वर्ल्ड स्पर्धा लढवली खरी, पण ती पहिल्या चौघींमध्ये मात्र स्थान मिळवू शकली नाही. सिनीने ११५ देशांमध्ये सहभागी मॉडेल्समध्ये चांगली कामगिरी बजावत 'टॉप' ८ पर्यंत झेप घेतली. पुढच्या फेरीसाठी सिनीची स्पर्धा लेबनॉनच्या यास्मिनशी होती. पण टॉप चारजणींमध्ये मात्र सिनीला स्वतःचे स्थान पक्के करता आले नाही. आता स्पर्धा संपल्यानंतरचा सिनीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून त्यात ती रडताना दिसत आहे. अर्थातच या अश्रूंमागे तिने आत्तापर्यंत घेतलेल्या कष्टांना अपेक्षित यश न मिळाल्याची भावना आहेच, पण यामुळे ती निराश होणार नाही हेदेखील तितकेच खरे. तिला सर्वोच्च यशाने हुलकावणी दिली असली तरी मिळालेल्या यशामुळे पुढील काळात मनोरंजन आणि फॅशन इंडस्ट्रीमध्ये बऱ्याच संधी आजमावता येतील, यात शंका नाही. कामात सातत्य आणि श्रद्धा ठेवली तर ती बरीच मोठी मजल मारताना दिसेल. सिनीचे कुटुंब मूळचे कर्नाटकचे असून ती स्वत: प्रसिद्ध मॉडेल आहे. ती एका राजघराण्यातील मुलगी आहे. वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी तिने 'मिस इंडिया'चा किताब पटकावला होता. शैक्षणिक पार्श्वभूमीबद्दल सांगायचे तर सध्या सिनी चार्टर्ड अकाउंटंटचे शिक्षण घेत आहे. एवढेच नाही, तर ती उत्तम भरतनाट्यम नृत्यांगना आहे. तिने 'निंबुडा' गाण्यावर नृत्य सादर केले.

एकीकडे या भव्य-दिव्य सोहळ्याची चर्चा असताना दुसरीकडे ऑस्कर सोहळ्यानेही रसिकांपुढे एक पट उलगडून दाखवला. हा सिनेजगतातील सगळ्यात मोठा सोहळा मानला जातो. अलिकडेच पार पडलेल्या या सोहळ्यात अनेक चित्रपट आणि कलाकारांचा सन्मान करण्यात आला. या वर्षीचा ऑस्कर सोहळा आणखी एका गोष्टीसाठी खास ठरला. तो म्हणजे यावेळी लोकप्रिय कला दिग्दर्शक नितीन देसाई यांना आदरांजली वाहण्यात आली. मराठमोळे कला दिग्दर्शक नितीन देसाई यांनी दोन ऑगस्ट २०२३ रोजी अकाली आणि निराशाग्रस्त स्थितीत प्रेक्षकांचा निरोप घेतला होता. मात्र त्यांचे कार्य इतके मोठे होते की आजही मराठीसोबतच बॉलिवूडच्या बड्या दिग्दर्शकांच्या तोंडावर सतत त्यांचे नाव असते. त्यामुळे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत जगभरातील सगळ्यात मोठ्या सोहळ्यात आदरांजली वाहण्यात आली. ■

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)